सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर रविवार, दि. १५ जून २०२५ | वर्ष - तिसरे | अंक ७३ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com









सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. १५ जून २०२५ | वर्ष - तिसरे | अंक ७३ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## भारतीय सैन्यात ४१९ कॅडेटस दाखल

### दिमाखात पार पडली पासिंग आऊट परेड

डेहराडून, १४ जून : भारतीय लष्करी अकादममध्ये (आयएमए) सविस्तर प्रशिक्षण घेतलेले ४५१ शूर कॅडेट्स आज, शनिवारी पास आऊट झाले. पासिंग आऊट परेडमध्ये (पीओपी) शेवटचा टप्पा ओलांडताच नव्या दमाचे ४१९ शूर अधिकारी भारतीय सैन्याचा भाग बनले. यासोबतच ३२ परदेशी कॅडेट्स देखील पास आउट झाले. समारंभाचे प्रमुख पाहुणे, श्रीलंकेचे लष्कराचे कमांडर, लेफ्टनंट जनरल बीकेजीएम लसांथा रॉड्रिगो यांनी पुनरावलोकन अधिकारी म्हणून परेडची सलामी घेतली.



आयएमएच्या चेटवुड बिल्डिंगच्या ड्रिल स्केअरमध्ये आज, शनिवारी देशाचे भावी कॅप्टन आर्मी बँडच्या तालावर छाती उंच करून परेडसाठी पोहोचले. कंपनी सार्जंट मेजर ड्रिल स्केअरवर आपापल्या जागी गेले. त्यानंतर, परेड कमांडर ड्रिल स्केअरवर आपले स्थान घेतले. मार्कर कॉलने परेडची सुरुवात झाली. कॅडेट्सच्या नेत्रदीपक मार्चपासने उपस्थित असलेले सर्वजण मंत्रमुग्ध झाले होते. पायऱ्या चढताना अभिमानाने भरलेली छाती, डोळ्यात आत्मविश्वास आणि परडे करतानाची शिस्त व सुसूत्रता यामुळे वातावरणात ऊर्जे चा संचार झाला होता. परेडनंतर झालेल्या डोकावणाऱ्या आणि शपथविधी समारंभानंतर, ४५१ जेंटलमन कॅडेट्स लेफ्टनंट म्हणून देश आणि परदेशातील सैन्याचा अविभाज्य भाग बनले. त्यापैकी ४१९ तरुण लष्करी अधिकारी भारतीय सैन्यात दाखल झाले. तसेच मित्र राष्ट्रांचे ३२ कॅडेट्सही पास आउट झाले. समारंभाचे प्रमुख पाहुणे, श्रीलंकेचे लष्कराचे कमांडर, लेफ्टनंट जनरल बीकेजीएम लसांथा रॉड्रिगो यांनी उत्तीर्ण होणाऱ्या कॅडेट्सचे अभिनंदन केले. त्यांनी कॅडेट्सना एकूण सर्वो त्तम कामगिरी आणि इतर उत्कृष्ट सन्मान प्रदान केले. यावेळी लष्कराच्या हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी करण्यात आली. पाहुणे लेफ्टनंट जनरल लसांथा रॉड्रिगो यांनी स्वतः डिसेंबर १९९० मध्ये आयएमएच्या ८७ व्या तुकडीतून कमिशन प्राप्त केले आहे. त्यांनी आयएमएमध्ये त्यांच्या जुन्या आठवणींनाही उजाळा दिला.

इंडियन मिलिटरी अकादमीची (आयएमए) स्थापना १ ऑक्टोबर १९३२ रोजी झाली. या अकादमीचा गौरवशाली इतिहास आहे आणि येथून उत्तीर्ण होणाऱ्या कॅडेट्सनी सर्व क्षेत्रात उत्कृष्टता प्राप्त केली आहे. अकादमीच्या पहिल्या तुकडीतून ४० कॅडेट्स उत्तीर्ण झाले. गेल्या ९० वर्षात अकादमीने त्यांची प्रशिक्षण क्षमता ४० कॅडेट्सवरून १६६० कॅडेट्सपर्यंत वाढवली आहे. आतापर्यंत या प्रतिष्ठित संस्थेतून ६५ हजारांहून अधिक कॅडेट्स उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये मित्र देशांतील कॅडेट्सचाही समावेश आहे.

या प्रसंगी, लेफ्टनंट जनरल देवेंद्र शर्मा, कमांडर लेफ्टनंट जनरल नागेंद्र सिंह, डेप्युटी कमांडर आणि चीफ इन्स्ट्रक्टर मेजर जनरल आलोक नरेश, पीओपीचे सर्व वरिष्ठ लष्करी अधिकारी, देश-विदेशातील मान्यवर आणि कॅडेट्सचे नातेवाईक उपस्थित होते.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी १५ ते १९ जून दरम्यान सायप्रस, कॅनडा, क्रोएशियाला भेट देणार

नवी दिल्ली, १४ जून : पंतप्रधान नरेंद्र मोदी १५ ते १९ जून दरम्यान सायप्रस, कॅनडा आणि क्रोएशियाचा दौरा करणार असल्याचं परराष्ट्र मंत्रालयाकडून सांगण्यात आलं आहे. परराष्ट्र मंत्रालयाच्या निवेदनानुसारपंतप्रधान नरेंद्र मोदी १५ ते १६ जून रोजी सायप्रसला भेट देतील. त्यानंतर १६-१७ जून रोजी जी-७ शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी कॅनडाला रवाना होती. त्यानंतर ते १८ जून रोजी क्रोएशियामध्ये पाच दिवसांच्या दौऱ्याचा समारोप करतील. सायप्रसचे अध्यक्ष निकोस क्रिस्टोडौलिड्स यांच्या निमंत्रणावरूनपंतप्रधान मोदी १५-१६ जून रोजी सायप्रसला अधिकृत भेट देतील. दोन दशकांहून अधिक काळातील भारतीय पंतप्रधानांचा हा पहिलाच सायप्रस दौरा असेल. निकोसियामध्ये असतानापंतप्रधान मोदी क्रिस्टोडौलिड्स यांच्याशी चर्चा करतील आणि लिमासोलमध्ये व्यावसायिक नेत्यांना संबोधित करतील, असे परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे. कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांच्या निमंत्रणावरून, पंतप्रधान मोदी त्यांच्या दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात १६-१७ जून रोजी कॅनडातील कनानास्किस येथे जी-७ शिखर परिषदेत सहभागी होतील.

## आडिवऱ्याच्या महाकाली मंदिरात ३७ वर्षांनी पुराचे पाणी

रत्नागिरी, १४ जून : राजापुर तालुक्यात काल रात्रीपासून पावसाचा कहर झाला आहे. श्रीक्षेत्र आडिवरे येथील श्री महाकाली मंदिरात ३७ वर्षांनंतर पुराचे पाणी शिरले आहे. तालुक्यातील भालावली, धाऊलवल्ली, कोतापूर, नवेदर परिसराला पावसाचा तडाखा बसला असून घरांमध्ये पाणी शिरले, तर रस्ते आणि पुलांची दुर्दशा झाली आहे.



जिल्ह्यात सक्रिय झालेल्या मान्सूनने चांगलाच जोर धरला आहे. शुक्रवारी सायंकाळपासून तालुक्यात पडलेल्या पावसाने राजापूर शहरासह ग्रामीण भागाला चांगलाच दणका दिला. या मुसळधार पावसामुळे अर्जुना आणि कोदवली नद्यांना पूर आला असून मध्यरात्री या पुराच्या पाण्याने सहा फुटांपर्यंत धडक मारली होती. वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसामुळे आडिवरे येथील प्रसिद्ध श्री महाकाली देवी मंदिर परिसरात पाणी शिरले होते. तब्बल ३७ वर्षांनंतर ही पूरपरिस्थिती निर्माण झाली. भालावली, धाऊवल्ली, कशेळी, नवेदर, कोतापूर या भागातील अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याने नुकसान झाले. धाऊलवल्ली भाटलेवाडी येथील वहाळावरील पूल पुराच्या पाण्यात वाहून गेला. राजवाडी वाडा भराडे येथील रस्त्यावर दरड कोसळली. भालवली परिसरात काही घरांमध्ये नदीला आलेल्या पुरांचे पाणी शिरले होते. काही घरांमध्ये सुमारे चार ते पाच फूट पाणी शिरले. भालावली गिरवणेवाडी येथे दरड कोसळून गावात जाणारा रस्ता बंद झाला आहे. मोगरे सडेवाडी येथे रस्त्यावर दरड कोसळली आहे. नवेदर येथील दिनेश पांचाळ यांच्या घरात पावसाचे पाणी शिरून नुकसान झाले आहे. भालावली येथे अनेक घरे, मंदिर तसेच सार्वजनिक रस्त्यांचे नुकसान झाले आहे. भालावली येथील मिलिंद आडविरकर यांच्या घरात पुराचे पाणी शिरून त्यांचे मोठे नुकसान झाले आहे. वाडा तिवरे येथे मधुकर गावकर यांच्या घरालगत दरड कोसळुन नुकसान झाले आहे. धाऊलवल्ली ग्रामपंचायतीचेही नुकसान झाले आहे. कोतापूर गावात कोतापूर वड ते एकवीरा देवी मंदिर या मार्गावरील नुकत्याच झालेल्या डांबरी रस्त्याची अवस्था या पावसाने अक्षरशः दयनीय झाली आहे.

पावसाच्या जोरदार प्रवाहाने रस्त्याचे डांबर उखडले असून, ठिकठिकाणी खड्डे आणि खाचखळगे निर्माण झाले आहेत. या रस्त्याच्या दुरवस्थेमुळे गावकऱ्यांच्या दैनंदिन वाहतुकीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. गावातील कही घरांच्या अंगणात आणि काही घरांमध्येही पाणी शिरले आहे. रिजवान मोनये यांच्या गॅरेजमध्ये पाणी शिरले. त्यामुळे गॅरेजमधील सामानाचे नुकसान झाले आहे.

## जळालेले मालवाहक जहाज टो करुन सुरक्षित ठिकाणी हलवले

कोची : सिंगापूरचा झेंडा लावलेले एमव्ही वान है ५०३ हे जहाज भारताच्या तटरक्षक दलाने टो करुन सुरक्षित ठिकाणी हलवले. याआधी सतत पाण्याचा मारा करुन तसेच जहाजावर विशिष्ट रासायनिक पावडरचा मारा करुन मालवाहक जहाजाची आग नियंत्रणात आणण्यात आली. यानंतर तटरक्षक दलाने जळालेले मालवाहक जहाज टो करुन सुरक्षित ठिकाणी हलवले. अर्धवट जळालेल्या जहाजातून काही कंटेनर समुद्रात पडले आहेत.



या कंटेनरना शोधून समुद्राबाहेर काढण्याचे काम सुरू आहे. तसेच कंटेनरमधील घटकांमुळे पाण्यात घातक रसायने मिसळू नये याची खबरदारी घेण्याचे काम सुरू आहे.

जळालेल्या मालवाहक जहाजावर २२ जण होते. यापैकी १८ जणांना भारताने वाचवले. जहाजावरील चार जण बेपत्ता आहेत. बेपत्ता असलेल्यांचा शोध सुरू आहे.

कोचीपासून सुमारे वीस सागरी मैलांवर असलेल्या जहाजाला ६०० मीटर लांबीच्या दोरखंडाने टो करण्यात आले अर्थात ओढण्यात आले आणि जहाज सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले.

नियमानुसार जहाज मालक आणि विमा कंपनी यांच्यात चर्चा होईल. यानंतर जहाज ज्या देशाच्या सागरी हद्दीत आहे त्या देशाला म्हणजेच भारताला माहिती दिली जाईल. यानंतर मालकाकडून ताबा घेतला जाईपर्यंत जळालेले जहाज भारतीय सागरी हद्दीत देखरेखीत, सुरक्षित ठिकाणी राहील.

अर्धवट जळालेल्या मालवाहक जहाजामुळे भारतीय किनारपट्टीचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होऊ नये यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्यात आली आहे. सध्या जहाज भारतीय किनाऱ्यापासून ३५ सागरी मैलांवर सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात आले आहे.

## नीट-यूजी परीक्षेचा निकाल जाहीर

### राजस्थानचा महेशकुमार देशात अव्वल

नवी दिल्ली, १४ जून : वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी राष्ट्रीय प्रवेश पात्रता परीक्षा (एनटीए) ने घेतलेल्या नीट-यूजी परीक्षेचा निकाल आज, शनिवारी जाहीर करण्यात आला. निकालांसोबत टॉपर्सची यादी देखील प्रसिद्ध करण्यात आली आहे.

यावर्षी नीट-यूजी परीक्षा सुमारे २०.८ लाख विद्यार्थ्यांनी दिली होती.यामध्ये राजस्थानचा महेश कुमार देशात अव्वल ठरला आहे. तर मध्य प्रदेशच्या उत्कर्ष अवधियाने दुसरा आणि महाराष्ट्राच्या कृषांग जोशीने तिसरा क्रमांक मिळवला आहे. मुलींमध्ये अविका अग्रवाल सर्वाधिक गुण मिळवून देशात अव्वल स्थान पटकावले अहो. दिल्ली, गुजरात आणि महाराष्ट्रातील अनेक विद्यार्थ्यांनीही या टॉपर्सच्या यादीत स्थान मिळवले आहे.

राष्ट्रीय परीक्षा संस्थेने नीट-यूजी परीक्षेसाठी सर्व श्रेणींसाठी कटऑफ गुण जाहीर केले आहेत. या वर्षी खुला प्रवर्ग आणि इडब्ल्यूएस श्रेणीतील उमेदवारांसाठी कटऑफ गुण ६८६ ते १४४ दरम्यान निश्चित केले आहेत. याशिवाय ओबीसी, एसी आणि एसटी श्रेणींसाठी नीट-यूजी २०२५ चा कटऑफ गुण १४३ ते ११३ दरम्यान निश्चित केला आहे. उमेदवार पशशीं.पींर. पळल.ळप ला भेट देऊन आपला निकाल पाहू शकतात.

## पित्यासह लेकीचा 'शॉक' लागून मृत्यू

जळगाव, १४ जून - रावेर तालुक्यातील तासखेडा येथे विजेचा धक्का बसून पित्यासह लेकीचा करुण अंत झाला. समाधान अशोक कोळी (३६) आणि त्यांची मुलगी मानवी कोळी (११) अशी या मृतांची नावे आहेत. समाधान यांच्या वडिलांनाही सुरुवातीला विजेचा धक्का बसला होता, त्यांना वाचवण्याच्या प्रयत्नात असताना ही घटना घडली.

समाधान यांचे वडील अशोक माधव कोळी हे घरात कापडे टांगण्यासाठी बांधलेल्या तारेवरील रुमाल घेण्यासाठी गेले असता त्या तारेत वीज प्रवाह उतरला होता. रुमालाला स्पर्श होताच तार तुटली आणि ते बाजूला फेकले गेले. हा प्रकार पाहताच समाधान व मानवी हे त्यांना उचलण्यासाठी आले ते तिथेच तारेला चिकटले.

## भाजीपाल्याचे दर वधारले, अवकाळी पावसाचा फटका

नाशिक, १४ जून : मे महिन्यात झालेल्या अवकाळी पावसाने शेतात उभा असलेला भाजीपाला पुर्णपणे खराब झाला. परिणामी बाजारातील आवक कमालीची घटली. त्यामुळे घाऊक आणि किरकोळ बाजारात भाज्याचे दर चांगलेच कडाडले. आता नवीन भाज्या बाजारात येईपर्यंत, दर चढेच राहणार असल्याचे व्यापारी वर्गाचे म्हणणे आहे. आवकाळी पावसाची कोणतीही शक्यता गृहीत न धरता शेतकरी वर्गाने आपल्या शेतात भाजीपाल्यासोबत वेलवर्गीय पिकाची लागवड केली. पिक ऐन जोमात असताना जोरदार पावसाने सर्व शेतमाल शेतातच खराब झाला. त्यामुळे जिल्ह्यातील सर्वच बाजारसमित्यांमध्ये आवक घटल्याने दरात तेजी निर्माण झाली.

महिन्यात अवकाळीने थैमान घातल्यानंतर जून महिन्याची सुरुवात काहीशी कोरडीच झाली. त्यामुळे पडलेल्या उन्हाचा तडाखा बसल्याने भाजीपाला करपण्यास सुरुवात झाल्याने त्याचे पर्यावसन दरवाढीत झाले. त्यामुळे किरकोळ बाजारात १५ ते २० टक्क्यांनी दर वाधारल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. विशेषता वांगी, दोडका, कारली, शिमला मिरची, गवार, वालपापडी, कोथिंबिर, कांदापात, मेथी या भाज्यांचे दर चांगलेच वधारले आहे. त्यामुळे सर्वांनाच काहीकाळ चढ्या दरानेच भाजीपाला खरेदी करावा लागणार असल्याने महिलावर्गाकडून चिंता व्यक्त करण्यात येत आहे.

मे महिन्यात भाजीपाल्याचे दर इतके वाढलेले नसतात. पावसाला सुरुवात झाल्यानंतर भाजीपाल्याचे दर वाढतात. मात्र सध्या वाढले आहेत इतके नसतात. आता पुढे खऱ्या अर्थाने पावसाळा सुरु होणार असल्याने एक ते दोन महिने जास्त पैसे मोजून भाज्या विकत घ्याव्या लागतील. अशी प्रतिक्रिया समोर येत आहे.

असे आहेत दर (प्रतिकिलो)

वांगी ६०, शिमला मिरची ७५, कारले ६०, दोडका ८७गिलके ४५, गवार ६५, वालपापडी ७० घेवडा ६०, मेथी ५० रु जूडी, कांदापात ४० रु जूडी.

## भारतीय अंतराळवीर १९ जून रोजी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाच्या दिशेने रवाना होणार

नवी दिल्ली : भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांना आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर घेऊन जाणारे ॲक्सिओम-४ मिशन १९ जून रोजी रवाना होणार आहे. याआधी वेगवेगळ्या तांत्रिक कारणांमुळे मागील काही दिवसांत ही मोहीम वारंवार पुढे ढकलली जात होती. आधी प्रतिकूल हवामानामुळे, नंतर यानातील वायू गळती सुरू झाल्याचे लक्षात आल्यामुळे मोहीम पुढे ढकलण्यात आली होती. केंद्रीय अंतराळ राज्यमंत्री जितेंद्र सिंह तोमर यांनी एक्स पोस्ट करुन ॲक्सिओम-४ मिशन १९ जून रोजी रवाना होत असल्याचे सांगितले. स्पेसएक्स कंपनीने या वृत्ताला दुजोरा दिला आहे. नासा, इस्रो, ॲक्सिओम



स्पेस आणि स्पेसएक्स कंपनी संयुक्तपणे ॲक्सिओम-४ मिशन राबवत आहेत.

मोहीम सुरळीत आणि सुरक्षितरित्या व्हावी यासाठी खबरदारी घेतली जात आहे. किरकोळ चूक नंतर जीवघेणी ठरू शकते. यामुळेच तांत्रिक दोष लक्षात येताच ते दूर करण्यासाठी मोहीम काही काळ पुढे ढकलली होती. पण आता परिस्थिती नियंत्रणात आहे आणि ॲक्सिओम-४ मिशन १९ जून रोजी रवाना होईल, असे या मोहिमेशी संबंधित असलेल्या वरिष्ठांकडून सांगण्यात आले.

ॲक्सिओम-४ मिशनमध्ये भारताचे शुभांशू शुक्ला तसेच पोलंड आणि हंगेरीचेही अंतराळवीर आहेत. ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला हे १९८४ नंतर अंतराळात जाणारे भारताचे दुसरे राष्ट्रीय अंतराळवीर आहेत. याआधी १९८४ च्या एप्रिल महिन्यात रशियाच्या यानातून भारतीय अंतराळवीर राकेश शर्मा अंतराळात गेले होते. यामुळे भारतीयांचे लक्ष ॲक्सिओम-४ मिशनकडे आहे.

## १०० रुग्णांसाठी मोफत किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर येथील कमलनयन बजाज हॉस्पिटल येथे शंभर रुग्णांसाठी मोफत किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले असून अलीकडेच या हॉस्पिटलमध्ये यशस्वीरीत्या १० मोफत मूत्रपेड प्रत्यारोपण करण्यात आल्या आहेत. या उल्लेखनीय याबाबत डॉक्टर आणि हॉस्पिटल प्रशासनाकडून माहिती देण्यात आली. या शस्त्रक्रिया प्रसिद्ध नेफ्रॉलॉजिस्ट डॉ. समीर महाजन आणि ज्येष्ठ किडनी ट्रान्सप्लांट सर्जन डॉ. अजय ओसवाल नेतृत्वाखाली पार पडल्या. दोन्ही डॉक्टरांनी ही योजना राबवण्यात त्यांच्या सनोगतातून समाधान व्यक्त केले.



सामाजिक बांधिलकीतून या मोफत मूत्रपिंड प्रत्यारोपण शस्त्रक्रियेचे रुग्णालयाचे सीईओ डॉ. जॉर्ज फर्नांडिस, यांच्या प्रेरणेतून सुरु केले आहे व यशस्वी रित्या रुग्ण बरे होऊन चांगले जीवन जगात देखील आहेत. याचे समाधान असल्याचे त्यांनी सांगितले. विशेष शासकीय योजनांमधून लाभ घेत, गरजू रुग्णांना आनंदाने आयुष्य जगण्याची संधी या माध्यमातून मिळाली आहे. कमलनयन बजाज हॉस्पिटल प्रशासनाने यासारख्या मानवतावादी वैद्यकीय उपक्रमांनी समाजात नवा आदर्श निर्माण केला आहे. अशा प्रकारच्या उपक्रमांतून गरजू रुग्णांसाठी जीवनदायी सेवा उपलब्ध होत असून, रुग्णालयाचे योगदान उल्लेखनीय ठरत आहे.

किडनी दात्याच्या आयुर्मावर मध्ये कोणताही परिणाम नाही - डॉ.समीर महाजन

किडनी दान केल्यानंतर दात्याच्या आयुर्मानावर काही परिणाम होतात असा समज आहे. आधीच कुटुंबातील एका सदस्याचे किडनी निकामी झालेली असते त्यातच दुसऱ्याने किडनी देऊन त्याचीही आयुष्य कमी होईल ही समाजात भीती आहे. प्रत्यक्षात असे काहीही नसून किडनी दात्याच्या आयुर्मानावर कोणताही वाईट परिणाम होत नाही, याबाबत समाजात जनजागृती होण्याची गरज असल्याचे नेफ्रॉलॉजिस्ट डॉ. समीर महाजन म्हणाले.

## नीती आयोगाच्या बक्षीसातून ७५ शेतकऱ्यांना सिंचनासाठी शेततळ्यांचे वाटप

धाराशिव, १४ जून : नीती आयोगाच्या 'आकांक्षीत जिल्हा उपक्रमांतर्गत सन २०२१ मध्ये धाराशिव जिल्ह्याला प्राप्त झालेल्या बक्षीस निधीचा उपयोग करत जिल्ह्यातील ७५ शेतकऱ्यांना सिंचनासाठी शेततळ्यांचे वाटप करण्यात आले आहे.या उपक्रमासाठी एकूण एक कोटी ७५ लाख रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात आले असून, त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना जलसंधारण व पाण्याचा शाश्वत वापर करण्यास मोठी मदत होणार आहे.

जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील पात्र शेतकऱ्यांची निवड करून त्यांना हे शेततळे देण्यात आले असून, त्यामध्ये धाराशिव तालुक्याचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे १४ शेतकऱ्यांना ३२.०२ लाख रुपये इतके आहे. त्यानंतर तुळजापूर तालुक्याला १२ शेतकऱ्यांना २८.६४ लाख, कळंबला ११ शेतकऱ्यांना २६.८९ लाख, उमरग्याला ५ शेतकऱ्यांना २४.६८ लाख, परंड्याला ७ शेतकऱ्यांना २१.३१ लाख, भूमला ९ शेतकऱ्यांना १७.५८ लाख, वाशीला १२ शेतकऱ्यांना १२.४६ लाख व लोहाऱ्याला ५ शेतकऱ्यांना ११.४१ लाख रुपयांचे शेततळे वाटप करण्यात आले आहे.

या शेततळ्यांमुळे पावसाळ्याच्या पाण्याचा साठा करून शेतकऱ्यांना वर्षभर सिंचनाची सुविधा मिळणार आहे. विशेषतः उन्हाळ्यातील पाण्याची टंचाई व पिकांची हानी या समस्यांना यामुळे आळा बसेल. शासनाच्या 'हर घर जल', 'वॉटर फॉर ऑल' आणि 'जलयुक्त शिवार' यांसारख्या अभियानांना हातभार लावणारी ही योजना असून, शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीतही याचा सकारात्मक परिणाम होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## कर्जमाफी आमच्या जाहीरनाम्यात नव्हती- मंत्री अतुल सावे

तभा वृत्तसेवा

हिंगोली, १४ जून

कर्जमाफीचे आम्ही वचन दिले नव्हते. आमच्या जाहीरनाम्यात कर्जमाफीचे वचन नव्हते. आम्ही दिलेले सर्व वचन पूर्ण करीत आहोत असे आश्चर्यकारक विधान दुग्धविकास मंत्री अतुल सावे यांनी पत्रकारांच्या प्रश्नाला उत्तर देतांना केले.



दुग्धविकास मंत्री अतुल सावे हे शनिवार दि १४ जून रोजी हिंगोली येथे संकल्प से सिध्दी तक, मोदी सरकारचे यशस्वी ११ वर्ष पूर्ण झाल्याबद्दल माहीती देण्यासाठी पत्रकार परिषदेसाठी आले होते. यावेळी पत्रकारांनी शेतकर्यांची संपूर्ण कर्जमाफीसाठी प्रहार जनशक्तीचे आ. बच्चू कडू यांनी सुरू केलेल्या आंदोलनाबाबत प्रश्न विचारला असता ना. सावे यांनी प्रश्नाला उत्तर देतांना सांगितले की, कर्जमाफीचे वचन आमच्या जाहीरनाम्यात नव्हते. जे वचन आम्ही जाहीरनाम्यात दिले आहेत ते पूर्ण करीत आहोत. महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बच्चू कडूंची भेट घेतली असून लवकरच त्यांची मुख्यमंत्र्यांसोबत सकारात्मक चर्चा होणार आहे. राज्यात नदीजोड प्रकल्प आणि वॉटरग्रीड योजनेसाठी ६१ हजार कोटींचा आराखडा तयार करण्यासाठी राज्य सरकारने निधी दिला आहे. त्यामुळे समुद्रामध्ये वाहून जाणारे पाणी अडवून आमच्या नद्यांमध्ये वळविण्यात येणार आहे. येणार्या ५० वर्षात दुष्काळ पडला तरीही या योजनेमुळे राज्यात पाणी कमी पडणार नाही. शेतकर्यांसह राज्यातील हिताचा हा मोठा प्रकल्प राज्य सरकारने हाती घेतल्याचेही यावेळी अतुल सावे यांनी सांगितले.

# हिंगोली कार्यालय वर्धापन दिन विशेष






























## अग्रलेख...

# ‘त्यांच्या’ स्वप्नांची राखरांगोळी

अहमदाबादच्या सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळावरून गुरुवारी लंडनसाठी उड्डाण करताच एअर इंडियाचे बोईंग विमान कोसळले. या विमानात २३० प्रवासी, १० क्रू मेंबर आणि २ पायलट असे २४२ जण होते. यातील एक प्रवासी वगळता उर्वरित २४१ जणांचा अतिशय हृदयद्रावक मृत्यू झाला. हे विमान विमानतळानजीकच्या बी. जे. मेडिकल कॉलेजच्या वसतिगृहावर कोसळले. त्यामुळे काही डॉक्टर, काही शिकाऊ डॉक्टर यांचाही दुर्दैवी मृत्यू झाला. यामुळे या विमान दुर्घटनेतील मृतांची संख्या २६५ झाली आहे. जखमींपैकी काहींची प्रकृती चिंताजनक असल्यामुळे बळींची संख्या आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

अपघातग्रस्त विमान बोईंग कंपनीचे होते. त्यांचे विमान आगीचा गोळा झाला. अपघाताचे दृश्य नंतर वृत्तवाहिन्यांच्या पडद्यावर पाहून अंगाचा थरकाप उडाला. हे विमान उड्डाण घेतल्यानंतर काही मिनिटांतच मेघानीनगर भागात असलेल्या एका वैद्यकीय महाविद्यालयाच्या वसतिगृहावर कोसळले. भोजनाची सुटी झाली असल्यामुळे अनेक डॉक्टर्स, शिकाऊ डॉक्टर्स तेथे जेवायला आले होते. पण काही कळण्याआधी म्हणजे हातातला घास तोंडात पोहोचायच्या आधीच त्यांना आपला जीव गमवावा लागला. भरल्या ताटावरूनच नाही तर भरल्या आयुष्यातून या सर्वांना उठावे लागले. रुग्णांच्या सेवेसाठी, त्यांचा जीव वाचवण्यासाठी अतिशय नोबेल असा वैद्यकीय व्यवसाय हौसेने स्वीकारणाऱ्या या शिकाऊ डॉक्टर्सच्या नशिबात रुग्णसेवेचे भाग्य नव्हते, यातील काहींवर तर स्वतःच रुग्ण होण्याची वेळ आली. नियतीची चेष्टा यालाच म्हणत असावे. या विमानात जसे भारतीय प्रवासी होते, तसेच ब्रिटन आणि अन्य काही देशांचेही प्रवासी होते. आपला हा प्रवास शेवटचा आहे, अशी कल्पनाही त्यातील कोणी केली नसावी. कारण आजच्या काळात विमानप्रवास हे कोणासाठीच अप्रूप राहिले नाही. त्यामुळे प्रत्येक जण आपल्या डोळ्यात नवे स्वप्न, नवी आशा आणि नवा उत्साह घेऊन निघाला होता. एकीकडे त्यांच्या मनात मायभूमी सोडून जाण्याचे दुःख जसे होते, तसे नव्या जीवनाची सुरुवात करण्याचे स्वप्नही होते. पण या सगळ्यांची स्वप्नं जागच्या जागीच राहिली. क्षणभरात सर्वांच्या स्वप्नांचीच नाही तर त्यांची स्वतःचीही शब्दशः राखरांगोळी झाली. क्षणभर विचार करण्याची आणि स्वतःला वाचवण्याची संधीही कोणाला मिळाली नाही. जिवंतपणी या सगळ्यांचा अंत्यसंस्कार झाला. मृत्यू डोळ्यासमोर दिसत असताना शेवटच्या क्षणाला हे सगळे लोक कसे सामोरे गेले असतील, त्यांच्या मनात कोणता विचार आला असेल, या कल्पनेनेही अंगाचा थरकाप उडतो. ज्यांच्या आयुष्याची सुरुवातही झाली नव्हती, अशा अनेक लहान मुलांचाही या भीषण दुर्घटनेत करुण अंत झाला. नियतीच्या या क्रूर चेष्टेने संपूर्ण जग हादरले आहे. विमानाने लंडनच्या दिशने उड्डाण केल्यानंतर त्यात बसलेले प्रवासीही स्वप्नांच्या झोपाळ्यावर विराजमान होत कधीच लंडनला पोहोचले होते. यातील प्रत्येकाचे लंडनला जाण्याचे उद्दिष्ट वेगळे होते. कोणाला शिकायला जायचे होते, तर कोणाला नोकरीसाठी, कोणाला आपल्या जीवलगाला भेटायचे होते, तर कोणाला तेथे आपल्या नवीन आयुष्याची सुरुवात करायची होती. त्यासाठी सर्व जण आपल्या मायभूमीचा जड अंतःकरणाने निरोप घेऊन निघाले होते.

गुजरातचे माजी मुख्यमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते विजय रुपानी यांचाही या अपघातात अंत झाला. आपल्या मुलीला भेटण्यासाठी रुपानी लंडनला चालले होते. पण आता ते आपल्या मुलीला तसेच त्यांची मुलगी आपल्या पित्याला कधीच भेटू शकणार नाही. विजय रुपानीसारखे असे अनेक दुर्दैवी पिता या विमानात असतील. ‘देव तारी त्याला कोण मारी’ या उक्तीचा परिचय देणारी घटनाही घडली. ब्रिटनमधील भारतीय वंशाचे रमेश विश्वासकुमार या अपघातातून आश्चर्यकारकरीत्या बचावले. त्यामुळे मारणाऱ्यापेक्षा वाचवणारा श्रेष्ठ असतो, याचा प्रत्यय येतो. मूळचे नागपूरकर असलेल्या यशा कामदार, त्यांच्या मुलीचा आणि सासूचा या अपघातात मृत्यू झाला असला तरी त्यांचे पती मात्र वाचले आहेत. पासपोर्टमधील काही त्रुटीमुळे त्यांना विमानात चढता आले नाही. त्यामुळे आपण जगल्याचा आनंद मानावा की आपले संपूर्ण कुटुंब दगावल्याचे दुःख अशी त्यांची संभ्रमित मानसिकता झाली असेल. विमानतळावर पोहोचायला दहा मिनिटे उशीर झाल्यामुळे एका प्रवाशाचाही जीव वाचला.

या विमान अपघाताची उच्चस्तरीय चौकशी सुरू झाली आहे. अपघातग्रस्त विमान ज्या बोईंग कंपनीचे होते, त्या कंपनीनेही चौकशीत सहकार्य करण्याची तयारी दर्शवली आहे. अपघात कसा झाला, का झाला, याची उत्तरे विमानातील ब्लॅकबॉक्समधून मिळतील. या चौकशीचा अहवाल काहीही असला तरी ज्यांनी आपले मौल्यवान जीव या अपघातात गमावले, ते कधीच परत येऊ शकणार नाही. एअर इंडियाचे संचालन करणाऱ्या टाटा कंपनीने अपघातातील मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी एक कोटी रुपयांची मदत जाहीर केली आहे. केंद्र सरकार आणि गुजरात सरकारही मृतांच्या कुटुबीयांना मदत जाहीर करू शकते. मात्र अशी कितीही आर्थिक मदत झाली तरी ज्यांनी आपले जीवलग गमावले, काहींनी आपले माता-पिता, काहींनी पत्नी, काही महिलांनी आपले सौभाग्य, काहींनी मुलं तर काहींनी आपले संपूर्ण कुटुंब गमावले, त्यांची भरपाई जगातील कोणतेच सरकार करू शकणार नाही, यात शंका नाही. हा अपघात की घातपात याचा आता शोध घेतला जाईल. मात्र विमानाचा ज्या पद्धतीने अपघात झाला, ते पाहता हा घातपात असल्याची शक्यता जास्त वाटते. या विमान अपघाताने वर्ल्ड ट्रेड सेंटरमधील विमानाने घडवलेल्या अतिरेकी हल्ल्याची काहीशी आठवण झाली. समाज माध्यमातून घातपाताची शक्यता वर्तवणाऱ्या काही बातम्या येत आहेत. मात्र त्यावर विश्वास ठेवता येत नाही. एनआयएकडे या अपघाताचा तपास सोपवण्यात आला आहे. या अपघातानंतर मानवी मनांची विसंगती दाखवणाऱ्या काही घटना समोर आल्या, त्या विषण्ण करणाऱ्या आहेत. अपघातानंतर जो मलबा खाली कोसळला, त्यातून एका महिलेचे धडविरहित नुसते शिर बाहेर फेकले गेले. तर त्या शिरासोबत काहींनी सेल्फी काढून आपल्या मनातील विकृतीचे घडवलेले दर्शन धक्कादायक असे म्हणावे लागेल. अशा लोकांना माणूस तरी कसे म्हणावे असा प्रश्न पडतो. रेल्वे अपघातानंतर जखमींना मदत करण्याऐवजी त्यांचे सामान, त्यांच्याजवळील मौल्यवान वस्तू पळवण्याच्या अनेक घटना आपल्याकडे घडल्या आहेत. अनेक वेळा तर प्रेताच्या टाळूवरील लोणी खावे तसे मृत व्यक्तीच्या हातातील अंगठी, गळ्यातील साखळी, महिला असतील तर त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र आणि अन्य दागिने हिसकवून पळ काढणारे नराधमही आपण पाहिले आहेत. माणसामध्ये वासना आणि वात्सल्य या दोन भावना असतात. या दोन्ही भावना विशेषतः वासनेची भावना मर्यादित ठेवायची असते. ही भावना अनावर झाली, त्यावर नियंत्रण ठेवता आले नाही तर अनर्थ घडतो. त्यामुळे संस्काराचे महत्त्व आहे.

माणुसकीला काळिमा फासणाऱ्या अशा घटना मोजक्या असल्या तरी घडल्या आहेत, दुसरीकडे माणुसकीचे दर्शन घडवणाऱ्या दिलासाजनक काही घटनाही समोर आल्या. दुर्घटनेनंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकांनी घटनास्थळी धाव घेत मदत आणि बचावकार्यात आपले योगदान दिले. जखमी लोकांसाठी रक्तदान करत रक्ताची तसेच अन्य आवश्यक गोष्टींची व्यवस्था केली. देशात कुठेही नैसर्गिक आपत्ती आली, पूर आला, भूकंप झाला, तर अनेक वेळा स्थानिक प्रशासन जागे व्हायच्या आधी रा. स्व. संघाचे स्वयंसेवक धावून जातात. संघाचे स्वयंसेवक सेवा, समर्पण आणि संस्काराचे अनुकरणीय उदाहरण म्हटले पाहिजे. विमान अपघातातील कारणांचा शोध घेऊन पुन्हा असे भीषण अपघात घडणार नाहीत, याची काळजी घेण्याची जबाबदारी विमान कंपन्यांसोबत सरकारचीही आहे. मोदी यांच्या नेतृत्वातील सरकार या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना करेल, अशी अपेक्षा आहे. हा विमान अपघात देशातील शेवटचा विमान अपघात ठरेल, अशी अपेक्षा आपण करायची का?

---

## यंगिस्तान

जयेश शत्रुघ्न मेस्त्री

# पुरुषांनाही समजून घ्या...

नुकतीच वटपौर्णिमा साजरी झाली आहे. अनेक स्त्रियांनी आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी व्रत केलं आहे. मात्र वटपौर्णिमेच्या काही दिवस आधीच एक भयावह प्रकरण उघडकीस आलं. मेघालय हनिमून मर्डर हे प्रकरण सध्या गाजत आहे आणि यात नवनवीन खुलासे होत आहेत. सोनम रघुवंशी या महिलेने तिचा पती राजा रघुवंशीला मारण्यासाठी २० लाख रुपयांची सुपारी दिली. इंदूरमध्ये खुनाचा डाव रचण्यात आला आणि मेघालयात राजा रघुवंशीचा खून करण्यात आला. त्यानंतर सोनमही गायब झाली होती. तिलाही मारलं आहे असा बनाव करण्यात आला. मात्र नंतर ती सापडली आणि सत्य समोर आलं. राज कुशवाह या प्रियकरासोबत तिने हा कट रचला. सध्या पत्नीने पतीचा खून केल्याची प्रकरणे समोर येत आहेत. खरं सांगायचं तर पत्नीने पतीवर अत्याचार केल्याची किंवा खून केल्याची प्रकरणे खूपच कमी आहेत.

नॅशनल क्राईम रेकॉर्ड्स ब्युरोच्या अहवालानुसार, पतीने किंवा त्याच्या नातेवाईकाने केलेल्या खुनाची किंवा अत्याचारांची ३९९६ प्रकरणे आहेत. मात्र पत्नीने केलेले अत्याचार याचे व्यवस्थित आकडे सापडलेले नाहीत. त्यामुळे तुलनेने अशी प्रकरणे कमी असण्याची शक्यता आहे किंवा अनेक प्रकरणांची नोंद नसल्याचीही शक्यता आहे. २०२४-२५ मध्ये सांगली, मेघालय, उत्तरप्रदेशात अशी मोठी प्रकरणे समोर आली आहेत. मात्र यावरून सबंध महिला वर्गाला दोष देणे चुकीचे आहे. सोशल मीडियावर महिला वर्गाला लक्ष्य करणारे पोस्ट्स फिरत आहेत. ज्यात ‘‘इतकी वर्षे महिलांवर बंधने का लादली कळले ना? त्यांना मोकळं सोडलं तेव्हा यांचे गुण दिसू लागले.’’ खरंतर अशा द्वेषपूर्ण वक्तव्याची गरज नाही. कोणावरही बंधने घालणे चूकच आहे. पुरुष वर्गाने महिला वर्गाचा आदरच करायचा आहे. महिला वर्गानेही एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की पूर्वी त्यांना प्रचंड त्रास सोसावा लागला असेल, आजही काही महिला बळी पडत असतील म्हणून ‘‘पुरुषी मानसिकता’’ हा शब्दप्रयोग वापरणे देखील चुकीचे आहे. आधुनिक काळात आपण महिलांच्या स्वातंत्र्याची, त्यांच्या इच्छा-आकांक्षांची, त्यांच्या हक्कांची इतकी चर्चा केली की पुरुष हा सर्व बाबतीत दुर्लक्षितच राहिला आहे. जगभरात जर आपण नजर फिरवली तर लक्षात येईल की सर्व महिलांवर घर चालवण्याचा, कमावण्याचा तसा दबाव नसतो. याचा अर्थ महिला काम करून कमावत नाहीत का? तर असं नव्हे. महिला उत्तम करीअर घडवत आहेत. कुटुंबाचा भारही सांभाळत आहेत. मात्र भारतात तरी अजूनही पुरुषाने घर चालवायचं आणि सगळी सुखं आपल्या पत्नीच्या चरणांवर अर्पण करायची अशी पद्धत आहे. हुंडा प्रथा ही जितकी वाईट तितकीच विपरीत-हुंडा प्रथाही वाईट आहे. लग्न करताना मुली मुलांकडून ज्या अपेक्षा करतात त्या विपरीत-हुंडा प्रकारात मोडतात. त्यामुळे आजच्या घडीला केवळ पुरुषाला दोष देता येत नाही. कधी आपण विचार केला आहे का की करीअर करण्यासाठी पुरुषावर किती दबाव असतो? वयात आला की लगेच करीअरची चिंता, मग नोकरी लागल्यावर फ्लॅट घेण्याचा दबाव, त्या कर्जाचे हप्ते फेडता फेडता तारुण्य निघून जातं. त्यात बायकोला समजून घेण्याचं, तिला सुखी ठेवण्याचं सामाजिक दडपण आणि मुलांना चांगलं आयुष्य देण्याचा दबाव. या सर्वांमध्ये पुरुषाचं सँडविच होत असतं. त्यामुळे आता स्त्री-पुरुषांना समान अधिकार आहेत असं म्हणत असताना खरोखरंच पुरुषांच्या अधिकारांकडे, त्यांच्या मानसिक भावनेकडे डोळसपणे पाहण्याची वेळ आली आहे.

तुम्हाला बंगळुरुच्या इंजिनीअरचे प्रकरण आठवत असेल. ज्यात त्याने २४ पानांची सुसाईड नोट लिहिली होती व ८१ मिनिटांचा व्हिडीओ प्रसिद्ध केला होता. पत्नी आणि तिच्या घरच्या लोकांच्या छळाला कंटाळून त्याने आत्महत्या केली. पत्नीने त्याच्याविरुद्ध हुंडा घेतल्याची खोटी तक्रार केली होती. घटस्फोट घेताना ३ कोटी रुपयांची मागणी करण्यात आली आणि लहान मुलासाठी ३० लाख मागण्यात आले होते. या अत्याचाराला कंटाळून त्याने आत्महत्या केली. आता इतके पैसे तो कुठून आणणार? महिलांना मिळणारी पोटगी हा त्यांचा अधिकार आहे. महिला घर सांभाळतात, घटस्फोट घेतल्यानंतर त्यांचा उदरनिर्वाह सुरळीत व्हावा म्हणून केलेली ही तरतूद आहे. परंतु आता महिला याचा गैरफायदा घेत असल्याचे दिसत आहे. मोहित यादव या उत्तर प्रदेशातील तरुणानेही पत्नीला कंटाळून आत्महत्या केली. असेच मध्य प्रदेशातील सुभम व्यास प्रकरण, ज्यात त्याची पत्नी आणि सासू मालमत्ता त्यांच्या नावावर करण्यासाठी दबाव आणत होते. एनसीआरबीनुसार २०२२ मध्ये १,१८,००० पुरुषांनी आत्महत्या केली आहे आणि यापैकी सुमारे ३३ टक्के म्हणजेच ३९,००० प्रकरणे कौटुंबिक वादाशी संबंधित आहेत. अर्थात महिलांनी छळ केल्यामुळे अशा आत्महत्या झाल्या आहेत, याचे आकडे उपलब्ध नाहीत. त्यामुळे थेट आरोप करणे चुकीचे आहे. मात्र काही प्रकरणे ठळकपणे दिसत आहेत. पुरुषांच्या खुनाच्या प्रकरणात खासकरून विवाहबाह्य संबंध समोर येत आहेत. सगळ्यात भयावह प्रकरण म्हणजे मेरठ उत्तर प्रदेश येथील मुस्कानने साहिल शुक्ला या प्रियकरासोबत मिळून पती सौभव राजपूतची हत्या केली. त्याचं प्रेत ड्रममध्ये भरण्यात आलं होतं.

मेघालय हनिमून मर्डरवरून पुरुष वर्ग चिडलेला आहे. लग्नाआधी जर मुलीचं कुणावर प्रेम असेल तर ते प्रेम मिळवण्यासाठी पतीची हत्या करण्याची काय गरज आहे? त्यापेक्षा पतीला याबद्दल सांगितलं तर सहज मार्ग निघू शकेल. हे खरं आहे की घरच्या दबावामुळे मुलीला दुसऱ्याच मुलाशी लग्न करावं लागतं. पण याचा अंत एका निष्पाप मुलाचा बळी देऊन नाही ना होऊ शकणार? विवाहबाह्य संबंध सामाजिकदृष्ट्या गुन्हा मानले जात असले तरी यातून चर्चा करून मार्ग काढला जाऊ शकतो. पतीपासून सुटकाच मिळवायची असेल तर सरळ सांगून टाकणं कधीही श्रेयस्कर आहे. परंतु महिला खुनाचा मार्ग अवलंबत आहेत. अशा कृत्यामुळे तुम्हाला तुमचं प्रेम तर मिळत नाहीच, तुरुंगात आयुष्यभर सडावं लागतंच मात्र एक जीव सुद्धा जातो. जर मुलं असतील तर त्यांचं आभाळ कोसळतं. चांगलं बालपण मिळालं नाही तर भविष्यही चांगलं घडत नाही.

लक्षात घ्या एकवेळ माणूस गरिबीतून वर येईल. मात्र आई-वडिलांची गलिच्छ भांडणे, आत्महत्या, खून या मानसिक धक्क्यातून बाहेर पडणं सोपं नसतं. आपण आता अत्यंत आधुनिक युगात जगत आहोत. या युगात आपल्याला महिलांच्या भावविश्वाचा जसा विचार करायचा आहे तसा पुरुषांच्या बाबतीतही करायचा आहे. ‘‘पुरुषी मानसिकता’’ या हिणकस शब्दाच्या पलीकडे आपल्याला जावं लागणार आहे. पुरुषालाही मन असतं, त्याच्या डोळ्यांतही साठवलेले व कोरडे झालेले अश्रू असतात, त्याचे मूड्स देखील स्विंग्स होतात. बऱ्याचदा त्याच्या हातात असलेल्या व्हिस्कीच्या ग्लासात तो आपलं दुःख विसर्जित करतो. मात्र स्त्री-पुरुष समानता म्हणताना आता आपल्याला पुरुष नव्याने समजून घ्यावा लागणार आहे.

writerjayeshmestry@gmail.com

---

## वेध

विजय कुळकर्णी

# मोफत उपचारांची अंमलबजावणी गरजेचे!

असं म्हटलं जातं की, कितीही पैसा कमाविला तरी एका आजाराला देखील पुरू शकत नाही. याचा अर्थ आपल्याला एखादा दुर्धर आजार जडल्यास त्याचा इलाज किंवा उपचार एवढा महाग असतो की, आयुष्यभराची जमापुंजी त्यावर खर्च होते. तरीही माणूस हाती लागेल की नाही याची कोणीही शाश्वती देऊ शकत नाही. एखाद्याला कर्करोग, हृदयविकार, मूत्रपिंड निकामी होणे इत्यादी प्रकारापैकी एखादा आजार जडला की, त्यावर मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो. या आजारांवरील उपचार देखील खूप महाग झाले आहेत. यासाठीच केंद्र आणि राज्य सरकारने आयुष्मान, मुख्यमंत्री सहायता निधी इत्यादी आरोग्य विषयक योजना सुरू केल्या आहेत. या योजनांची अंमलबजावणी अधिक कठोरतेने करणे आवश्यक आहे.

अनेकदा रुग्णाची प्रकृती एकदम खालावते. त्याला दवाखान्यात नेल्यावर डॉक्टर पुढील उपचारासाठी अकोला, अमरावती, नागपूर, छत्रपती संभाजीनगरला घेऊन जाण्यास सांगतात. १०८ क्रमांकाची रुग्णवाहिका शासकीय असल्याने मोफत मिळते. पण, वरील शहरातील खाजगी रुग्णालयात रुग्ण नेल्यावर तेथील रिसेप्शनिस्ट सांगतात की, आधी किमान १० हजार रुपये भरा. त्याशिवाय रुग्णाला दाखल करून घेत नाहीत. रुग्णाचे नातेवाईक त्यांच्या गावातील दवाखान्यातून परस्पर रुग्ण घेऊन आलेले असतात. त्यांना रुग्णाला त्वरित दुसऱ्या शहरात हलवावे लागेल याची कल्पना देखील नसते. अशावेळी ते त्यांच्याकडे असलेले आयुष्मान कार्ड किंवा इतर केंद्र, राज्य सरकारच्या योजनेचे कार्ड दाखवितात. पण, रिसेप्शनिस्ट त्याकडे पाहतही नाही. पैसे भरावेच लागतील, असे सांगण्यात येते. मग, पैशाची जमवाजमव करून नातेवाईक त्यांच्याकडे पैसे भरतात. त्यानंतर रुग्णाची तपासणी केली जाते. मग, सर्व चाचण्या पुन्हा कराव्या लागतात. त्याच्या खर्च वेगळा. शिवाय, डॉक्टर फक्त तपासणी करतात. गोळ्या, औषध, इंजेक्शन, सलाईन, सलाईनची सीरिंज, सुईपासून सर्व रुग्णाच्या नातेवाईकांना बाहेरून आणावे लागते. मग, सर्व चाचण्यांचे अहवाल प्राप्त झाल्यावर डॉक्टर आवश्यक असल्यास शस्त्रक्रिया करण्यास सांगतात. त्याचा खर्च वेगळा. एखाद्याला हृदयविकाराचा धक्का बसल्यावर त्याला रुग्णालयात नेल्यावर डॉक्टर तपासणी करून त्याची ॲन्जिओग्राफी किंवा ॲन्जिओप्लास्टी करण्याचा सल्ला देतात. अशा रुग्णाकडे शासकीय योजनेचे कार्ड असले तरीही त्यांना हा उपचार कोणत्या शहरातील कोणत्या रुग्णालयात केला जातो, याची माहिती नसते. शासकीय अधिकारी, कर्मचारी आपल्या व आपल्या परिवारासाठी आरोग्य विमा काढतात. पण, प्रत्यक्षात जेव्हा, रुग्णाला दवाखान्यात नेले जाते त्यावेळी त्या रुग्णालयाचे प्रशासन त्यांना प्रथम पैसे भरा. आम्ही तुम्हाला सर्व बिले देऊ. तुम्ही नंतर ती विमा कंपनीकडे पाठवून परतावा मिळवा. विमाधारक परतावा मिळविण्यासाठी विमा कंपनीकडे त्याचा विमा प्रस्ताव पाठवितो. त्या प्रस्तावाची विमा कंपनीची समिती छाननी करते व उपचारावर प्रत्यक्षात झालेल्या खर्चापैकी काही टक्के खर्च कपात करून उर्वरित खर्च विमाधारकाला दिला जातो. यामुळे नोकरदार मध्यमवर्गीयांना देखील अनेक आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागते. गोरगरीब, शेतकरी, यांना तर शासकीय आरोग्य योजनांची अगदी जुजबी माहिती असते. त्यामुळे त्या योजनांचा लाभ कसा मिळवावा याची माहिती त्यांना दिली गेली पाहिजे. शासनाने सुरू केलेल्या आरोग्य विषयक योजनांची कठोर अंमलबजावणी होण्यासाठी विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. अनेकदा हर्नियावरील शस्त्रक्रिया करण्यासाठी खाजगी डॉक्टर शासकीय रुग्णालयात जाण्याचा सल्ला देतात. पण, यामुळे शासकीय रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताण वाढतो. याचा देखील विचार झाला पाहिजे. काही खाजगी रुग्णालयाचे प्रशासन तर आमच्या रुग्णालयात कोणत्याही शासकीय योजनेंतर्गत उपचार होत नसल्याचे अगदी हमखास सांगतात. अशा रुग्णालयांची चौकशी करून तेथे शासकीय मोफत आरोग्य योजनांचा लाभ रुग्णांना देणे बंधनकारक केले पाहिजे. तसेच, आयुष्मान, मुख्यमंत्री सहायता निधी इत्यादी शासकीय योजनांचे कार्ड ज्या रुग्णांकडे आहे त्यांना खाजगी असो की, शासकीय रुग्णालयात कोणतेही शुल्क न आकारता उपचार मिळाले पाहिजेत. तसेच, खाजगी रुग्णालयात उपचार झाल्यावर त्यांच्याकडून शासनाकडे प्रस्ताव पाठविल्यावर त्याला त्वरित मंजुरी देऊन त्या रुग्णालयाला त्यांचे बिल तातडीने पाठविण्याची जबाबदारी शासनाने घेतली पाहिजे. तसे झाले तरच केंद्र आणि राज्य शासनाने सुरू केलेल्या मोफत आरोग्य योजनांचा लाभ तळागाळातील रुग्णांना घेणे शक्य होणार आहे.

८८०६००६१४९

---

## मुंबई वार्तापत्र

नागेश दाचेवार

# फडणवीसांची ‘चाणक्य-नीती’!

महाराष्ट्रातील राजकारणामध्ये एक वेगळंच ट्विस्ट आणणारी घटना गुरुवारी सकाळी घडली. ती म्हणजे, वांद्रे येथे असलेल्या ताज लॅण्ड्स एंड या हॉटेलात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट होती. खरंतर संपूर्ण मुंबईत मागील काळात लागलेल्या बॅनर, पोस्टर्सवरून ठाकरे बंधू पुन्हा १९ वर्षांनंतर एकत्र येणार अशी चर्चा महाराष्ट्रात चांगलीच रंगली होती. दोन्ही गटांतील नेत्यांनी, पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी ही मागणी लावून धरली होती. उद्धव ठाकरेंनी तर ‘महाराष्ट्राच्या मनात जे आहे तेच होईल’ असे वक्तव्य करून राज यांना टाळी देण्यास आपण उतावीळ असल्याचे दाखवून दिले होते. असं सगळं घडत असताना, ठाकरे बंधू एकत्र येण्याच्या चर्चांनी जोर धरलेला असतानाच, ऐनवेळी फडणवीसांच्या एन्ट्रीने ठाकरे बंधूंच्या मनोमिलनामध्ये अचानक ट्विस्ट आला. टायमिंग साधत फडणवीसांनी असा काही खेळ खेळला की त्यांच्या ‘चाणक्य-नीती’ने जवळजवळ उद्धव ठाकरेंचा गेम झालाय्, हे वेगळं सांगायची गरज आहे असे वाटत नाही.

मुळात राजकारणात टायमिंग साधण्याचा आणि ते फिरवण्याचा हातखंडा फडणवीसांकडे आहे. हे यापूर्वी अनेकदा दिसून आलेले आहे. उद्धव ठाकरेंनी पाठ दाखविल्यानंतर देवेंद्र फडणवीसांनी त्यांना दाखविलेली आपली हातोटी ठाकरे सध्यातरी विसरले असावे असे वाटत नाही. २०१९ मध्ये उद्धव ठाकरेंकडून मिळालेल्या धोक्यानंतर, फडणवीसांनी राज्यसभा, विधान परिषद निवडणुकीत ठाकरेंना चांगलाच इंगा दाखविला. एवढंच नव्हे तर, सत्तेसाठी ज्या फितुरीने, गद्दारीने पाठीत खंजीर खुपसून खुर्चीत जाऊन बसले, तेथून अब्रूची लक्तरं वेशीला टांगून, अत्यंत अपमानास्पदरीत्या खाली खेचून, फडणवीसांनी ठाकरेंची खोड मोडली होती. लोकसभेनंतर थोडं डोकं वर काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, अवघ्या काहीच महिन्यांत विधानसभेत तोंड दाखवायला जागा ठेवली नव्हती. आणि आता जेव्हा मुंबई महापालिकेची निवडणूक तोंडावर असताना फडणवीसांनी पुन्हा एकदा दंड थोपटल्याचे दिसत आहे.

राज ठाकरे यांना सोबत घेण्याबाबत तसे फडणवीस नेहमीच सकारात्मक राहिले आहेत. मात्र, राजकीय अपरिहार्यतेमुळे अनेकदा यात यश मिळू शकले नाही, तो भाग वेगळा. मात्र, राज यांनी महायुतीचा भाग व्हावं यासाठी ते नेहमीच आग्रही राहिले आहेत. त्यामुळे फडणवीसांनी यावेळी जी



मैदानात उडी घेतली आहे, ती सहजच असेल असे वाटून घेण्याचं काही कारण नाही. फडणवीस मुरलेले नेते आहेत. त्यांनी महाराष्ट्राच्या मातीतल्या पैलवानाला अस्मान दाखविले आहे. यापूर्वी फडणवीस स्वतः असो, शिंदे असो किंवा सामंतांसोबतची राज ठाकरेंची भेट असो. या सर्व भेटींनंतर या नेत्यांसह फडणवीसांनी आम्ही राज्यातील गंभीर प्रश्नांवर चर्चा केल्याचे वेळोवेळी सांगितले होते. त्यामुळे ताज लॅण्डमध्ये फडणवीस आणि राज ठाकरे यांच्या स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी युतीबाबत चर्चा जरी झालेली असली तरी, फडणवीस हे राजकारणातील धुरंधर आणि चाणाक्ष राजकारणी आहेत. भेटीच्या मूळ विषयाला बगल देत फडणवीस वेळ मारून नेतील यात शंका नाही. मात्र, त्यांनी आपला जो गोल आहे तो साध्य केलाच असेल, याबाबत दुमत असण्याचं कारण नाही.

मध्यंतरी उद्धव ठाकरेंना मनसे आणि ठाकरे गटात युती होणार का? असा प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर उत्तर देताना ठाकरेंनी संकेत काय बातमीच देतो असे म्हणत महाराष्ट्रातील जनतेच्या मनात जे आहे तेच होईल असे सांगितले होते. त्यांच्या या उत्तराने मनसे आणि ठाकरे गटातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पसरले होते. मात्र, युती होण्याच्या अंतिमक्षणी फडणवीसांनी राजकीय चक्र फिरवून उबाठा गट-मनसे युतीला ब्रेक लागेल याची पूर्ण तजवीज केल्याचे दिसत आहे.

मुळात उद्धव ठाकरे हे सार्वजनिक ग्राहक झालेले आहेत की काय असा प्रश्न आता या निमित्ताने उपस्थित होतो. कारण उद्धव आणि संजय राऊत यांच्या म्हणण्यानुसार भाजपाने सडवलं. उपयोग संपला आणि अलगद काढून बाजूला केलं. त्यानंतर २०१९ साली महायुतीला स्पष्ट बहुमत असताना, शरद पवारांनी स्वतः सरकारमध्ये येण्यासाठी संजय राऊतांमार्फत पुन्हा उद्धव ठाकरेंना ग्राहक बनवलं. ठाकरेंच्या खांद्यावर बंदूक ठेवून बनवलेलं सरकार मुळात अडीच तीन वर्षे शरद पवारांनीच चालवलं. ठाकरे बिचारे तर दोनदा मंत्रालयात आले. ते देखील शरद पवारांनीच महाराष्ट्राला अवगत करून दिलं. आता सुप्रिया सुळे पंतप्रधान मोदींचे गुणगान गाताना दिसत आहेत. एका इंग्रजी दैनिकात म्हणे, भला मोठा लेखच लिहिलाय् ताईंनी. आणि शरद पवारांची राजकीय कारकीर्द, स्वभाव आणि भाजपा, मोदींबाबतचा त्यांचा दृष्टिकोन सगळ्यांना माहितीच आहे. हे सगळं बघता, पवारदेखील सत्तेत सहभागी व्हायला काही अडचण आजघडीला तरी दिसत नाही. मग ते थेट महायुतीत सहभागी होतील नाहीतर अजित पवारांसोबत येऊन, आडमार्गाने येऊ शकतात. आणि हे सगळं उद्धव ठाकरे उघड्या डोळ्यांनी बघत बसतील, अशी परिस्थिती आज ठाकरेंवर आलेली आहे. एकेकाळी महायुतीतला महत्त्वाचा घटक शिवसेना होता, उद्धव ठाकरे होते. कमळाबाई म्हणून हिणवूनसुद्धा भाजपाने सोबत ठेवून महत्त्व दिलेच होते. पण आता शरद पवारांचे ग्राहक बनून अशी परिस्थिती झाली की ते बाहेर फेकले गेले आणि शरद पवार तेव्हाही मजेत राहिले, भविष्यातही राहतील. तसेच आता राज ठाकरेंनी त्यांना ग्राहक बनविल्याचे दिसत आहे.

महेश मांजरेकरांच्या एका मुलाखतीत एक हाडूक टाकलं, त्याला चघळत उबाठावाले आशा लावून बसले. आता हाडूक टाकून तीन महिन्यांचा कालावधी लोटला आहे. या दोन भावांना एकत्र यायचं असतं तर कधीच आले असते, त्यांना कुठे दिल्लीला, हायकमांडला कुणाला विचारायचे आहे. ना वर कोणाला विचारायचं आहे, ना खाली. तशी या दोन्ही पक्षाची संस्कृतीच नाही. मग माशी कुठे शिंकली? मुळात त्यावेळी शरद पवारांचे राजकारण उद्धव ठाकरेंना समजले नाही आणि आता राज ठाकरेंचे... खरं सांगायचं तर उद्धव ठाकरेंना राजकारणच उलगडलं नाही. माणसानं एकदा का विश्वासघात केला आणि सत्याचा मार्ग सोडला, तर त्याची अशीच ससेहोलपट होत राहते. हेच वास्तव आहे.

९२७०३३३८८६

---

### नागरिकांचा विश्वासघात का होतो आहे?

राजकारण ही एक जनसेवा असताना किंबहुना राजकीय मंडळी तसेच म्हणत असताना त्यांना पेन्शनमध्ये, भत्त्यांमध्ये, परदेशी प्रवासांमध्ये, तसेच वीज, पाणी, फोन, मोबाईलच्या सवलती कशासाठी? एक पेन्शन दिली गेली तर ठीक आहे. परंतु काही वेळा तीन तीन पेन्शन मिळतात ही कोणाची फसवणूक आहे, हे जरा सद्सदविवेकबुद्धीने राजकीय मंडळींनी तपासण्याची गरज आहे.

जेव्हा वेतन, भत्ते वाढविले जातात तेव्हा सत्ताधारी असो वा विरोधक सर्व एकत्र येतात. त्यावर लवकरच कायदा आणून उपाययोजना व्हावी. तसेच गुन्हेगार किंवा गुन्हेगाराचा ठपका बसलेले निवडणुकीत उमेदवार असता कामा नयेत. संसदेत सेवा करणे हा नक्कीच सन्मान आहे, परंतु अशाप्रकारे जनतेच्या करातून मिळालेल्या रकमेचा अपव्यय म्हणजे विश्वासघातच म्हणावा लागेल. यामुळे काही प्रामाणिक जनसेवेकरी राजकीय मंडळींवर याचा ठपका बसतो याचाही विचार व्हावा.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

### आसामच्या मुख्यमंत्र्यांचा योग्य निर्णय

इतिहास काळापासून मुसलमान आक्रमकांनी अनेक हिंदू व बौद्ध मंदिरांचा विध्वंस केला आहे. महमूद ग़ज़नीने सोमनाथाचे मंदिर फोडले अशी ऐतिहासिक नोंद आहे. बाबर या क्रूर इस्लामी शासकाने इ.स. १५२७ मध्ये प्रभू श्रीरामांचे अयोध्या येथील भव्य मंदिर उद्ध्वस्त केले. काशी येथील काशी विश्वनाथ मंदिराजवळ मशीद औरंगजेबाने काशी विश्वनाथ मंदिर पाडून बांधली असा दावा इतिहासकारांनी केला आहे. मथुरा येथे औरंगजेबाने मथुरा कृष्ण जन्मभूमी संकुल मंदिर पाडून मशीद बांधली. आज हीच परंपरा अखंड चालू आहे. इतिहासकालीन किल्ला म्हणा किंवा एखादे हिंदूचे प्रसिद्ध देवस्थान म्हणा पाहायला गेलो तर तेथील लगतच्या टेकडी किंवा डोंगरावर एक तर तुम्हाला मजार किंवा मोठा दर्गा झालेला दिसतो. हा बांधलेला दर्गा किंवा मशीद सरकारी जागा बळकावून असते. महसूल, सरकारी अधिकारी याकडे मुद्दाम डोळेझाक करतात. मग त्याविरुद्ध स्थानिकांनी आवाज उठवला की विषय सांप्रदायिक होऊन बसतो. मग यातून कोर्टकचेरी सुरू झाली की इतक्या वर्षापासून हा येथे आहे याचा दाखला दिला जातो.

## वाचक पत्रे

मतांच्या राजकारणासाठी राजकीय नेते याविरुद्ध बोलण्यास तयार नाही. काँग्रेस पक्षाने तर सर्वधर्मसमभाव स्वीकारला असल्याने त्याच्या एजेंडामध्ये हा विषय नाही. कारण त्याच्या मुस्लिम व्होट बँकेला धक्का लागतो. भाजपने हा मुद्दा लावून धरला तर त्याला सांप्रदायिक रंग दिला जातो. उत्तराखंडमध्ये वन क्षेत्रात अनधिकृतरीत्या मोठ्या संख्येने मजारी बांधल्या गेल्याची माहिती समोर आली आहे. उत्तराखंडला देवभूमी म्हणतात. या ठिकाणी हिंदूंचे हरिद्वार, बद्रीनाथ, केदारनाथ धाम आहेत. याच क्षेत्रात मशिदी, मजारी मोठ्या प्रमाणात बांधल्या जातात ही बाब लक्षात घेण्यासारखी आहे.

पहिल्यांदा आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्व सरमा यांनी जाहीररीत्या ही बाब बोलून दाखवली आहे की यापुढे आसाममध्ये हिंदूंची धार्मिक स्थळे आणि परंपरा यांच्याशी छेडछाड सहन केली जाणार नाही. परिसरात मशिदी बांधणे सामाजिक सौहार्द धोक्यात आणू शकते, असे सांगत त्यांनी मंदिरांच्या ठिकाणी मशिदी बांधण्यास विरोध केला आहे. प्रत्येक राज्य सरकारने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. परवानगी देताना बहुसंख्य समाजाच्या भावना दुखावणार नाही याची दक्षता घेणे गरजेचे आहे. आज या बाबी छोट्या दिसत असल्या तरी कधी विक्राळ रूप धारण करतील हे समजणार नाही.

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

### रक्तदान सर्वश्रेष्ठ दान!

आज १४ जून. आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक रक्तदान दिन म्हणून साजरा केला जातो. ऑस्ट्रेलियातील डॉ. कार्ल लॅंडस्टेनर या संशोधकाच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस जागतिक रक्तदाता दिन म्हणून साजरा केला जातो. रक्तदान श्रेष्ठदान असं म्हटलं जातं कारण या दानामुळे माणसाचा जीव वाचतो. आपल्या रक्तामुळे कोणाचा तरी जीव वाचतो म्हणूनच रक्तदानाला सर्वश्रेष्ठ दान असे म्हणतात. रक्तदानाच्या रूपाने आपण मानवतेला एक मोठी देणगी बहाल करतो. रक्तदान केल्याने कोणतीही इजा किंवा दुष्परिणाम होत नाही. मनुष्याच्या शरीरात ५ लिटर रक्त असते आणि रक्तदानात केवळ ३५० मिली इतकेच रक्त घेतले जाते.त्यामुळे कोणतीही कमजोरी जाणवत नाही.



विशेष म्हणजे २४ ते ४८ तासांत जेवढे रक्त आपण दान दिले आहे तेवढे पूर्ववत होते. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने रक्तदान केले पाहिजे. रक्तदान सर्वश्रेष्ठ दान असले तरी आपल्याकडे रक्तदात्यांची संख्या खूपच कमी आहे. भारतात फक्त ०.६ टक्केच लोक रक्तदान करीत असतात. त्यामुळे देशात रक्ताची खूप कमतरता भासते. जर रुग्णांना वेळीच रक्त मिळाले नाही तर त्यांचा मृत्यूही होऊ शकतो त्यामुळे प्रत्येकाने जागरूक राहायला हवे. रक्तदान म्हणजे जीवनदान, रक्तदान सर्वश्रेष्ठ दान हे लक्षात घेऊन प्रत्येकाने रक्तदान करायला हवे.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# आई वडिलांची सेवा हीच ईश्वर सेवा-प.पूज्य प्रदीप मिश्राजी



**तभा वृत्तसेवा**
**चाकरवाडी दि.११ जून**

देव हा देवच आहे, तो लहान किंवा मोठा नसतो, देवाची भक्ती ही भक्तीच असते ती कोणत्याही देवाची असली तरी चालते. नामस्मरणात मानवी जीवनाला सुख मिळत असते. त्यामुळे देवात भेद न करता देवा समान आई-वडिलांची सेवा करा असा मौलिक सल्ला परमपूज्य प्रदीप मिश्राजी यांनी दिला.

चाकरवाडी येथे विसाव्या शतकातील महा न संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या कृपा आशीर्वादाने व तपो निधी शांती ब्रह्म गुरुवर्य श्री महादेव महाराज तात्या यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने आयोजित शिवपुराण कथेत प्रदीप जी मिश्रा बोलत होते.

## २४ तास महाप्रसाद

श्री क्षेत्र चाकरवाडी येथे विसाव्या शतकातील महान सद्गुरू संत ज्ञानेश्वर माऊली दादा यांच्या कृपा आशीर्वादाने व तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य श्री महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली होत असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व शिवमहापुराण कथा कार्यक्रमास आलेल्या लाखो भाविक भक्तांना २४ तास महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. सर्व भाविक भक्तांना गेली अनेक वर्षे पासून महाप्रसादाची व्यवस्था माऊली दादाच्या कृपा आशीर्वादाने अविरत सुरू आहे.

## करवीर पिठाचे शंकराचार्य यांची चाकरवाडी भेट



दरम्यान मंगळवारी करवीर पिठाचे शंकराचार्य यांनी चाकरवाडी येथे माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यास व प पूज्य प्रदीप मिश्राजी यांच्या शिवमहापुराण कथेस भेट दिली भाविक भक्तांना आशिर्वाद दिले.

# श्रीगुरु शंकरलिंग शिवाचार्य महाराज यांचे वैद्यनाथ दर्शन आणि बेलवाडी मंदिरास भेट

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.११ जून**

श्री१०८ गुरू शंकरलिंग शिवाचार्य महाराज, मठ संस्थान खरोळा (ता. शिरूर अनंतपाळ, जि. लातूर) यांनी मंगळवारी परळी वैजनाथ येथे सदिच्छा भेट दिली. द्वादश ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री प्रभू वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाचे त्यांनी दर्शन घेतले.

दर्शनानंतर श्रीगुरु महाराजांनी बेलवाडी येथील श्री संत गुरुलिंग स्वामी मंदिर संस्थान येथे भेट दिली. यावेळी संस्थानचे अध्यक्ष श्री दत्तात्रयआप्पा ईटके गुरुजी यांनी महाराजांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन औपचारिक स्वागत केले व त्यांचे शुभाशीर्वाद घेतले. यावेळी महाराजांनी संत गुरलिंग स्वामी मंदिर बेलवाडी येथे झालेल्या नवीन बांधकामाचे पाहणी करून समाधान व्यक्त केले.



या प्रसंगी समाजातील मान्यवर माजी नगराध्यक्ष सोमनाथआप्पा हालगे, महादेव ईटके, दयानंद स्वामी, विकास हालगे, श्याम बुद्रे, रमेश चौंडे, संजय खाकरे, नितीन समशेटी, सुशील हरंगुळे, प्रकाश खोत, शिवकुमार चौंडे, दत्तात्रय गोपनपाळे, दीपक स्वामी, फुलारी आप्पा, गणेश स्वामी, व योगेश स्वामी यांचा समावेश होता. श्रीगुरु महाराजांच्या आगमनाने परिसरात भक्तिभावाची लहर निर्माण झाली होती.

# परिक्षक व नियामक यांचे पेपर तपासणीचे मानधन तत्काळ द्या

## मराठवाडा शिक्षक संघाची विभागीय सचिव यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.११ जून**

फेब्रुवारी/मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी बोर्ड परिक्षेच्या तपासलेल्या उत्तर पत्रिकांचे मानधन तात्काळ देण्यात यावे असी मागणी मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय सचिव यांच्याकडे करण्यात आली आहे.

याबाबत मराठवाडा शिक्षक संघाचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य बंडू अघाव यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी / मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी बोर्ड परीक्षेच्या उत्तर पत्रिका तपासलेल्या परीक्षक व नियामकांना दिले जाणारे मानधन शिक्षण मंडळाने अद्याप पर्यंत दिले नाही तरी ते त्वरीत देण्यात यावे अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे छत्रपती संभाजीनगरचे सचिव भाई चंद्रकांत चव्हाण व जालण्याचे सचिव संजय येळवंते यांनी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या सचिव यांना प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन देऊन केली आहे.



सदरील मागणीकडे दुर्लक्ष केल्यास व वेळकाढूपणाचे धोरण अवलंबविल्यास मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव व सरचिटणीस राजकुमार कदम यांच्या मार्गदर्शना व नेतृत्वाखाली आपल्या कार्यालयासमोर तिव्र आंदोलन केले जाईल असा इशारा निवेदनात दिला आहे.सदरील निवेदन मंडळाच्या उपसचिव प्रियाराणी पाटील यांनी स्विकारले.

निवेदनावर मराठवाडा शिक्षक संघाचे छत्रपती संभाजीनगर जिल्हा सचिव भाई चंद्रकांत चव्हाण, जालना जिल्हा सचिव संजय येळवंते यांच्यासह संघटनेचे ए.एस.ढमढेरे, व्ही.ई.चव्हाण, व्ही.आर.सोलाटे,विनोद केनेकर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.असे अघाव यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# पालखी मार्गावरून मोठ्या वाहनांच्या प्रवेशास बंदी घालण्याची शिवसेनेची मागणी

पोलीस निरीक्षक यांना निवेदन देत तातडीने कारवाईची विनंती

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.११ जून**

यंदाच्या आषाढी यात्रेनिमित्त परळी शहरात दाखल होणाऱ्या संतांच्या पालख्या आणि त्यासोबत येणाऱ्या हजारो वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी पालखी मार्गावरील वाहतुकीची विशेष व्यवस्था करण्यात यावी, तसेच या मार्गावरून मोठ्या वाहनांच्या (ट्रक, टेम्पो, हायवा इत्यादी) प्रवेशास तात्काळ बंदी घालण्यात यावी, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्यावतीने करण्यात आली आहे.

या मागणीसंदर्भातील निवेदन आज शुक्रवार, दिनांक ६ जून रोजी परळी शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांना देण्यात आले. हे निवेदन शिवसेनेचे माजी नगराध्यक्ष आणि पक्षाचे नेते मा. अभयकुमार (पप्पू अण्णा) ठक्कर यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आले.

यावेळी शिवसेना युवा नेते प्रा.अतुल दुबे,सामाजिक कार्यकर्ते ड.



मनोज संकाये,श्रीनिवास सावजी युवासेना जिल्हा उप प्रमुख मोहन परदेशी, शिवसेना माजी शहर संघटक संजय कुकडे, सुधाकर वाघमारे, कारभारी शिंदे, योगेश जाधव यांच्यासह अनेक शिवसैनिक व नागरिक उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, नगर परिषदेमार्फत संत जगमित्र नागा मंदिर समोरील मार्गावर '८ फूटांपेक्षा उंच वाहनांना प्रवेशबंदी' असे स्पष्टपणे नमूद करून कमान उभारण्यात आली आहे. तरीदेखील मोठ्या वाहनांचा या मार्गावरून वारंवार प्रवास सुरू आहे, ज्यामुळे पालख्या आणि वारकऱ्यांच्या सुरळीत प्रवासात अडथळा निर्माण होत आहे.

शिवसेनेने यावर तात्काळ बंदोबस्त वाढवून वाहतूक नियंत्रणासाठी ठोस पावले उचलावीत, अशी मागणी केली आहे. तसेच, वारकऱ्यांना सुरक्षित, शांततामय व निर्विघ्न मार्ग मिळावा यासाठी पोलिस प्रशासनाने तत्काळ आणि प्रभावी कारवाई करावी, अशी अपेक्षाही निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे.

# साबला येथे नवनियुक्त महिला कर्मचारी यांचा सन्मान सोहळा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**केज दि.११ जून**

केज तालुक्यातील साबला ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने नवनियुक्त पोलिस कॉन्स्टेबल काकडे वैशाली भगिरथ, अंगणवाडी शिक्षिका काकडे शिवकांता अजय, अंगणवाडी मदतनिस मुळे शोभा आमोल यांचा सन्मान सरपंच जनाबाई नरहरी काकडे, उपसरपंच कचराबाई राजेंद्र सरवदे, सदस्य ज्ञानेश्वर पांचाळ, एआरटी संस्था, यवतमाळ प्रकल्प व्यवस्थापक वली तांबोळी, प्रकल्प सहाय्यक ज्योती सांबरे, प्रदिप दहिरे यांच्या सर्वांच्या उपस्थित कार्यक्रम संपन्न झाला.तसेच काकडे वैशाली यांनी गरिब पस्थितीवर मात करून शालेय प्राथमिक, माध्यमिक शिक्षण घेतले. वैशालीच्या मनामध्ये एक जिद्ध आपण आपल्या स्वतःच्या पायावर उभे राहिले पाहिले ते वैशालीने पूर्ण करून दाखवले. सत्कार स्विकारत असताना असे म्हटले की गावातील मुलांनी मुलांनी शालेय शिक्षण घेऊन स्पर्धा परीक्षेसाठी तयारी करावी. जर नोकरी नाही लागली तर एखादा उदयोग व्यवसाय निवडावा आणि आई वडिलांचं स्वप्न साकार करण्यासाठी प्रयत्न करावा.

# छत्रपती शिवाजी महाराज व पुण्यश्लोक अहिल्यादेवींचा विचार आत्मसात करणे हेच फाऊंडेशनचे उद्दिष्ट-दिपक होळकर

## बोरगाव येथे आरोग्य तपासणी शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.११ जून**

रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा हा संकल्प डोळ्यासमोर ठेऊन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्माउत्सवानिमित्त व शिवराज्याभिषेक सोहळ्याचे औचित्य ठेवून बोरगांव बु.येथे भव्य मोफत आरोग्य तपासणी व मोफत औषधोपचार शिबिर तसेच कायदेविषयक जनजागृती शिबिर घेण्यात आले.

फाऊंडेशन व अहील्या प्रबोधनी मंच तर्फे करण्यात आले .सदरील शिबिरास उपजिल्हा रुग्णालय केज पंचायत समिती केज यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ.मोराळे , डॉ.शेटे ,डॉ.सावंत , डॉ.कुलकर्णी ,डॉ.राऊत औषध निर्माण अधिकारी श्री चाटे यांनी आरोग्य तपासणी केली.कायदेविषयक जनजागृती करताना ड. डी. टी.सपाटे व ड. मिसळे एस. व्ही. यांनी परखड शब्दांत ग्रामस्थांना मार्गदर्शन व नवी दिशा दिली. शिबिरात ग्रामस्थांनी उत्स्फूर्तपणे तपासणी करून औषध उपचार करून घेतले

आरोग्य शिबिरास रामहरी राऊत (कार्याध्यक्ष शिवसेना मदत कक्ष महा.राज्य.) ड.योगेश दिलीप चांगण अध्यक्ष आरंभ फाऊंडेशन व श्री शशिकांत बापू गव्हाणे भारतीय किसान संघ यांचे अमूल्य व मोलाचे मार्गदर्शन लाभले

शिबिर यशस्वीतेसाठी आरंभ फाऊंडेशन चे सचिव व अहिल्या प्रबोधनी मंच चे अध्यक्ष श्री.दिपक रमेश होळकर मंचचे सचिव ड. उत्तरेश्वर बा.निंगुळे, विजय निंगुळे फौजी, अशोक निंगुळे, गोपाळ निंगुळे,जगन्नाथ होळकर ,निलेश निंगुळे,भगवान मामा गाते,लोंढे मामा,बाबासाहेब निंगुळे व्यवस्थापक निखिल मुसळे, पवन बोराडे,गणेश गुरव, दिगंबर निंगुळे व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सव समितीचे बोरगांव बु.चे पदाधिकारी यांनी मोलाचे सहकार्य केले. या आरोग्य शिबिराचे सूत्रसंचलन कु.सायली दिगंबर होळकर व ड श्री उत्तरेश्वर बा.नींगुळे यांनी. सामाजिक उपक्रमाने कार्यक्रम घेण्यात आल्याने सर्वत्र कौतुक केले जात आहे

# अंबाजोगाई येथे शासकीय वसतिगृहात आदिवासी मुला-मुलींची प्रवेश प्रक्रिया सुरु

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ जून**

अंबाजोगाई शहरात शिक्षण घेत असलेल्या इयत्ता ८ वी पासून पुढील वर्गातील सर्व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांनी आदिवासी विकास विभागामार्फत चालविल्या जाणा-या अंबाजोगाई येथील आदिवासी मुलां मुलींच्या शासकीय वसतिगृहासाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठी प्रवेश प्रक्रिया सुरु झालेली आहे.

तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी wwwswayam.mahaonline.gov.in या संकेत स्थळावर जावून ऑनलाईन अर्ज करावेत. काही अडचण आल्यास गृहपाल, आदिवासी मुलांचे- मुलींचे शासकीय वसतिगृह अंबाजोगाई जि. बीड यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृहाचे गृहपाल यांनी केले आहे.

# देवगिरी प्रतिष्ठाण संचलित तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयास नॅक 'बी' ग्रेड

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ जून**



शिक्षण क्षेत्रात सातत्याने गुणवत्ता आणि प्रगतीकडे वाटचाल करणाऱ्या देवगिरी प्रतिष्ठाण संचालित तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयांने राष्ट्रीय मूल्यांकन व मानांकन परिषद (नॅक) कडून 'बी' ग्रेड मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.विशेष बाब म्हणजे हे महाविद्यालय कायम विनाअनुदानित असूनही गुणवत्तेचे निकष पूर्ण करताना हे मानांकन मिळवण्यात यशस्वी ठरले आहेत.

# निवड व वरिष्ठ वेतन श्रेणी, वैद्यकीय बिले तसेच महागाई भत्त्यासाठी बेमुदत धरणे आंदोलन : कास्ट्राईब

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.११ जून**

तालुक्यातील शिक्षक कर्मचारी बांधवांचे गेल्या अनेक वर्षापासून जिल्हा परिषद बीड स्तरावर प्रलंबित असलेले निवड व वरिष्ठ वेतन श्रेणी मिळून ३२ प्रस्ताव वैद्यकीय बिले ३९ प्रस्ताव व महागाई भत्त्याच्या संदर्भातील प्रश्नांची सोडवणूक होत नसल्याकारणाने महा.राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या वतीने शिक्षणाधिकारी(प्रा) यांना गटशिक्षणाधिकारी माजलगाव यांच्यामार्फत निवेदन देण्यात आले आहे.गटशिक्षणाधिकारी कार्यालयासमोर नवीन शैक्षणिक वर्षाच्या दुसऱ्याच दिवसापासून म्हणजे १७ जून पासून बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार आहेत.

वरिष्ठ पातळीवरील अधिकाऱ्यांनी नियमित सेवा बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांवर अन्याय करून त्यांचे मूलभूत अधिकार डावलले आहेत.राज्य शासनाच्या नियमानुसार सेवा कालावधीनुसार निवड व वरिष्ठ वेतनश्रेणी बंधनकारक आहे.मात्र अनेक कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव विविध टप्प्यावर प्रलंबित असून,त्याचे निराकरण होत नाही.परिणामी कर्मचारी आर्थिक व मानसिक त्रास सहन करत आहेत.तसेच शासकीय नियमानुसार अधिकृत रुग्णालयामधून केलेले उपचारानंतर सादर केलेली वैद्यकीय बिले मंजूर करणे बंधनकारक असतानाही,महिन्यानंतरही ती मंजूर न होणे ही गंभीर बाब आहे.त्यामुळे अनेक कर्मचाऱ्यांना वैयक्तिक कर्ज काढावे लागत आहे.काही प्रकरणांमध्ये कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांच्या उपचारासाठी वेळेत मदत न मिळाल्याने गंभीर परिणाम झाले आहेत.केंद्र व राज्य शासनाकडून महागाई भत्ता वेळोवेळी जाहीर केला जातो.मात्र संबंधित भत्याची अंमलबजावणी व आदा यामध्ये विलंब होत आहे. शासनाने २०२४ मध्ये महागाई भत्ते बाबत स्पष्ट निर्देश दिले असताना सुद्धा प्रत्यक्ष पातळीवर त्याची अंमलबजावणी करण्यात दिरंगाई व टाळाटाळ होताना दिसून येत आहे. या सर्व प्रकरणाची सोडवणूक व्हावी व दप्तर दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर-कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करण्यात यावी या आशयाचे वरिष्ठ पातळीवर बेमुदत धरणे आंदोलनाचे निवेदन दिले असताना सुद्धा त्यावर कोणतीच कारवाई होताना दिसून येत नाही.त्यामुळे बेमुदत धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले आहेत.आणि भविष्यातही जर याची दखल घेतली गेली नाही तर,या आंदोलनाची व्याप्ती निश्चितच वाढत जाणार आहे.असा इशारा महासंघाचे जिल्हा संघटन प्रमुख भारतभाऊ टाकणखार,ता.सचिव अभिमन्यू इबिते.जि.उपाध्यक्ष वसंतभाऊ टाकणखार,रवी आदमाने,हनुमंत पांढरपोटे,राजेंद्र सातपुते,शिवाजी भाळशंकर,राहुल खुणे,गोरख उघडे,निलेश गावडे,किरण शिंदे,नारायण भाळशंकर,अमोल राऊत,धोंडीराम रामुळे,जीवन डोंगरे,किरण माने,सय्यद आयुब नागनाथ पडलवार,प्रवीण जाधव,सुमित घाडगे,गोविंद पवार,शंकर पवार,बळीराम घनगाव,नितीन पुटवाड,शेख मतीन,विजय वैराग्य,अविनाश येळंबकर,कृष्णा हौसरमल,राजकुमार सोनवणे,प्रतीक स्वामी व तालुकाप्रमुख राहुल टाकणखार यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

# मोदींचे सरकार भ्रष्टाचारमुक्त, पारदर्शी आणि जनतेची सेवा करणारे

## पत्रकार परिषदेत दुग्धविकास मंत्री अतुल सावे यांचे प्रतिपादन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ जून**

२०१४ पूर्वी शासनाकडून विविध योजनांचा पैसा येत होता परंतु तो सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचत नव्हता. परंतु २०१४ साली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात सरकार स्थापन झाल्यानंतर किसान सन्मान निधी, पंतप्रधान आवास योजना, जनधन योजना, गरीब कल्याण योजनांसह सर्व योजनांचा पैसा डीबीटीच्या माध्यमातून लाभार्थीपर्यंत पोहोचत आहे. मोदीजींच्या नेतृत्वात भ्रष्टाचारमुक्त, पारदर्शी आणि सामान्य जनतेच्या हिताचे सरकार देशाला मिळाले असल्याचे प्रतिपादन इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास मंत्री अतुल सावे यांनी केले.

येथील शासकीय विश्रामगृहात शनिवार दि १४ जून रोजी पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारला ११ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल संकल्प से सिध्दी तक पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना अतुल सावे म्हणाले की, पंतप्रधान मोदी यांच्या सरकारने २०४७ पर्यंत देशाला विकसित करण्याचा संकल्प केला आहे. त्या दिशेने आम्ही पाऊल टाकत आहोत. भारत देश अर्थव्यवस्थेत ११ व्या स्थानावर होता. मोदींनी भारताला ५ व्या स्थानावर आणले असून लवकरच आम्ही चौथ्या क्रमांकाची अर्थसत्ता होणार आहोत. मेक इन इंडीया आणि आत्मनिर्भरच्या माध्यमातून लोकल टू व्होकल पासून ते सैन्यांसाठी लागणारी शस्त्रे आज भारतात तयार होत आहे. ही शस्त्रे किती प्रभावशाली आणि शक्तीशाली आहेत. याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे ऑपरेशन सिंदूर नुकतेच भारतीय सैन्याने यशस्वी केले. या युध्दात वापरण्यात आलेले एअर डिफेंस, फायटर विमाने आणि मिसाईल भारतात तयार झाले आहेत. २०१४ पूर्वी आम्हाला शस्त्रे बाहेर देशातून आयात करावी लागत होती. परंतु आज भारत मेक इन इंडिया आणि आत्मनिर्भरच्या माध्यमातून प्रगती करीत आहे.

शेतकरी, महिला, युवा, कामगार, नोकरदार तसेच समाजातील वंचीत घटकांच्या विकासासाठी पंतप्रधान मोदी यांचे सरकार वेगाने काम करीत आहे. देशातील रस्ते, रेल्वे, विमानतळे तसेच औद्योगिक क्षेत्रात देश क्रांती करीत आहे. त्यामुळे संपूर्ण जगाचे लक्ष भारताकडे लागले आहे. नवनवीन उद्योग देशात येत आहेत. त्यामुळे युवकांच्या हाताला काम मिळत आहे. स्टार्टअप, एमएसएमई यांसारख्या योजनांमधून मोठे उद्योजक तयार होत आहेत.

गोरगरीबांना राहण्यासाठी घर असले पाहीजे, घरात महिलांना स्वयंपाक शिजवण्यासाठी गॅस सिलेंडर असले पाहीजे, शौचालये, बेटी पढाओ, बेटी बचाओ, लखपती दिदी योजना, ५ लाखांपर्यंत आयुष्मान योजना, वयोवृध्दांना मोफत उपचार आदी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत असून देशातील कोट्यावधी लोक या योजनांचा लाभ घेत आहेत.

कोरोना काळात संपूर्ण जगात मंदीची लाट असतांना पंतप्रधान मोदी यांच्या सरकारने देशातील १४० कोटी जनतेला मोफत लसीकरण करण्याचा निर्णय घेतला. त्याची अंमलबजावणी करण्यात आली. अमेरीका, जपान, जर्मनीसारख्या देशांनी कोरोना लसीकरणासाठी जनतेकडून मोबदला घेतला. या काळात गोरगरीबांना मोफत अन्नधान्य वाटपचा महत्वाकांक्षी निर्णयही पंतप्रधान मोदी यांनी घेतला. मोदींच्या ११ वर्षाच्या काळात भारत देश विकासाच्या दिशेने वाटचाल करीत असून सर्व सामान्यांची सेवा हाच या सरकारचा संकल्प असल्याचे प्रतिपादन अतुल सावे यांनी केले.

# दुकाने फोडून रक्कम पळविणारे दोघे चोरटे जेरबंद

## हिंगोली स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ जून**

बळेगाव पाटीवरील बळीराजा ट्रेडर्स दुकानाचे शटरचे कुलूप तोडून तसेच शटर तोडून दुकानातील गल्ल्यातून नगदी रक्कम पळविल्याप्रकरणी हट्टा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास करण्याचे आदेश पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गोपनीय माहीतीच्या आधारे दोघांना याप्रकरणी अटक केली असून त्यांनी इतरही चोरीचे गुन्हे कबुल केले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार वसमत तालुक्यातील बळेगाव पाटीवरील बळीराजा ट्रेडर्स या दुकानाचे शटरचे कुलूप तोडून तसेच शटर तोडून गल्ल्यातील नगदी ७ हजार रूपयांची रक्कम चोरट्यांनी चोरून नेली होती. याप्रकरणी हट्टा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात कोम्बींग ऑपरेशन, ऑल आऊट ऑपरेशन, नाकाबंदी आदी ऑपरेशन राबविण्यात येत आहेत. या प्रकरणातील आरोपींचा शोध घेण्यासाठी कोकाटे यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विकास पाटील यांना आदेश दिल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेचे पथक जिल्हा हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना त्यांना मिळालेल्या गोपनीय माहीतीच्या आधारे श्रावण सुखदेव पवार वय २१ रा कारखाना, राजु गणेश पवार वस २१ रा इंदिरा नगर कळमनुरी यांना मध्यरात्री ताब्यात घेतले. त्यांच्याकडून ५२०० रूपये जप्त केले असून आरोपींची अधिक चौकशी केली असता त्यांनी परभणी जिल्ह्यातील रामेटाकळी येथील बँकेची तिजोरी फोडून चोरी केली असल्याचे सांगितले आहे. सदरील कारवाई पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, पोनि विकास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि शिवसांब घेवारे, उपनि विक्रम विठूबोने, सपोनि संग्राम जाधव यांचय पथकाने केली आहे.

# कळमनुरी येथील उपजिल्हा रूग्णालयाच्या वसाहतीतील निवासस्थानांमध्ये जीवे मारण्याची धमकी देत चोरी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ जून**

कळमनुरी येथील उपजिल्हा रूग्णालयाच्या निवासस्थानांमध्ये एका कुटुंबास लोखंडी रॉडने जीवे मारण्याची धमकी देऊन ४.४० लाखांचा मुद्देमाल चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी कळमनुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार औंढा नागनाथ तालुक्यातील मेथा येथील रामेश्वर शिंदे हे कळमनुरी उपजिल्हा रूग्णालयाचय निवासस्थान क्रमांक तीनमध्ये राहतात. शुक्रवारी रात्रीच्या सुमारास शिदे कुटुंबीय जेवण करून झोपले होते. शनिवारी पहाटेच्या सुमारास तीन चोरट्यांनी लोखंडी रॉडने त्यांच्या घराचा दरवाजा तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर चोरट्यांनी घरातील कपाट फोडण्यास सुरूवात केली. यावेळी धरात आवाज होत असल्याने शिंदे कुटुंबीय जागे झाले असतांना चोरट्यांनी त्यांना लोखंडी रॉडने जीवे मारण्याची धमकी देत शांत राहण्यास सांगितले. त्यानंतर चोरट्यांनी कपाटातील दिड तोळे वजनाचे सोन्याच गंठण, प्रत्येकी एक तोळे वजनाच्या तीन सोन्याच्या अंगठ्या, दोन ग्राम वजानाच्या कानातील बाळ्या, चार ग्राम वजनाचे सोन्याचे गहू मनी असा एकूण ४.४० लाख रूपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केला. त्यानंतर शिंदे यांचा मोबाईल घेऊन बाजूला ठेवला. त्यानंतर चोरट्यांनी अन्य दोन घरात चोरीचा प्रयत्न केला. याप्रकरणी शिंदे यांनी दिलेल्या तक्रारीवरून कळमनुरी पोलिस ठाण्यात तीन आरोपीविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. पोलिस निरीक्षक मोहन भोसले, सहायक पोलिस निरीक्षक रघुनाथ शेवाळे, जमादार प्रशांत शिंदे, गजानन होळकर यांच्या पथकाने घटनास्थळी भेट दिली असून चोरट्यांचा शोध पोलिस घेत आहे.



**हिंगोली– राज्याचे दुग्धविकास मंत्री अतुल सावे हे शनिवारी हिंगोली दौऱ्यावर आले असता भारतीय जनता पक्षाच्यावतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर आदी. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### बाल कामगार दिनानिमित्त स्वाक्षरी मोहीम



हिंगोली– जगभरात १२ जून हा आंतरराष्ट्रीय बालकामगार विरोधी दिन म्हणून पाळला जातो. या पार्श्वभूमीवर सरकारी कामगार अधिकारी कार्यालय व जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, जिल्हा बाल संरक्षण कक्षाच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये अपर जिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांच्या उपस्थितीत स्वाक्षरी मोहिम राबविण्यात आली. यावेळी सरकारी कामगार अधिकारी एस. जी. फड, दुकाने निरीक्षक एस. जे. पेरके, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी सरस्वती कोरडे, बाल संरक्षण अधिकारी (संस्थात्मक) गणेश मोरे, बाल संरक्षण अधिकारी संस्थाबाह्य जरीबखान पठाण, सामाजिक कार्यकर्ता रामप्रसाद मुडे, रेशमा पठाण, समुपदेशक सचिन पठाडे, क्षेत्रबाह्य कार्यकर्ता अनिरुध्द घनसावंत इत्यादी उपस्थित होते.

### आज मुनीश्री डॉ. शांतीप्रिय यांचे प्रवचन



हिंगोली– येथील नवा मोंढा परिसरातील मार्केट यार्डमध्ये सकल श्वेतांबर जैन संघाच्यावतीने राष्ट्र संत श्री ललित प्रभू डॉ मुनिश्री शांतीप्रिय यांचे प्रवचन दि १५ जून रविवारी सकाळी ९ ते ११ या काळात आयोजित करण्यात आले आहे. या प्रवचनासाठी सहकुटुंब यावे असे आवाहन सकल श्वेतांबर जैन संघाच्यावतीने करण्यात आले आहे.

### त्रिशुल नवदुर्गा महोत्सव समितीकडून दिंडीतील वारकऱ्यांची भोजनाची व्यवस्था

हिंगोली– शहरातील प्रसिद्ध असलेल्या त्रिशूल नवदुर्गा महोत्सव समितीच्या वतीने मागील १८ वर्षांपासून हिंगोली शहरातून पंढरपूर कडे जाणाऱ्यां सर्व पायी दिंडीत चालणारे महिला पुरुष भाविक भक्त यांना नाष्टा चहापाणी भोजनाची व्यवस्था समितीच्या वतीने कराळे डिग्रस पाटीजवळ असलेल्या गणपती मंदिरात दिंडी वारकऱ्यांची वेगवेगळे व्यवस्था करण्यात आली होती.यावेळेस पंढरपूरला जाणाऱ्या सर्व वारकऱ्यांना त्यांच्या सोयीप्रमाणे चहा नाश्ता जेवण आणि विश्रांतीची व्यवस्था समितीच्या वतीने करण्यात येते या सोयी सुविधाचा लाभ सर्व वारकऱ्यांनी घेण्याची आव्हान मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. वारकऱ्यांसाठीचा कार्यक्रम साधारणतः २० दिवसापर्यंत सतत चालू असतो आणि याकरिता मंडळाचे सर्व कार्यकर्ते अहोरात्र परिश्रम घेत असतात.

# लॅपटॉप खरेदीसाठी पात्र लाभार्थ्यांनी अर्ज सादर करावेत

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ जून**

जिल्हा परिषद सेस योजना सन २०२५-२६ मधून २० टक्के मागासवर्गीय कल्याण निधी अंतर्गत ग्रामीण भागातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना लॅपटॉप खरेदीसाठी अर्थसहाय्य पुरविण्यासाठी अर्जदारांकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहे.

या योजनेंतर्गत विद्यार्थी हा ग्रामीण भागातील रहिवाशी असावा. वैद्यकीय (एमबीबीएस, बीएएमएस, बीडीएस, बीएचएमएस व तत्सम), अभियांत्रिकी (बीई, बीटेक) या शाखेतील पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमात शिक्षण घेत असावा. ही योजना डीबीटी तत्वावर राबवावयाची असल्याने निवड झालेल्या लाभार्थ्यांनी प्रथम लॅपटॉप खरेदी करुन अनुदानासाठी मूळ देयकासह प्रस्ताव जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्याकडे सादर केल्यानंतर अनुदानाची रक्कम त्यांच्या खरेदी किंमती इतकी किंवा जास्तीत जास्त ३० हजार रुपये त्यांच्या बँक खात्यावर वर्ग करण्यात येणार आहे.

हिंगोली जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रहिवाशी असणाऱ्या एससी, एसटी, व्हीजेएनटी व एसबीसी प्रवर्गातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी आपले परिपूर्ण प्रस्ताव संबंधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती अथवा जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली या कार्यालयात दि. २५ जून, २०२५ पर्यंत सादर करावे. विलंबाने प्रस्ताव सादर केल्यास त्याचा विचार केला जाणार नाही याची दक्षता घ्यावी, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार, प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी गिता गुट्टे यांनी केले आहे.

# औंढा येथे भारतीय जनता पक्षाची कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ जून**



देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या केंद्र सरकारला अकरा वर्षे पूर्ण झाल्याने भारतीय जनता पार्टी पक्षाच्यावतीने औंढा नागनाथ शहरातील व्हीआयपी विश्राम गृह येथे कार्यशाळा घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अकरा वर्षाच्या कार्यकाळात झालेल्या विकास कामाची माहिती कार्यकर्त्यांना देण्यात आली.

यावेळी भाजपा नूतन तालुकाध्यक्ष सर्जेराव दिंडे यांचा जिल्हा संयोजक फुलाजी शिंदे यांच्या व मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यशाळेस भाजपाचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, जिल्हा संयोजक फुलाजी शिंदे, किसान मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष सुरजितसिंह ठाकूर, किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष दिनकर कोकरे, प्रदेश कार्यकारणी सदस्य पांडुरंग पाटील, प्रदेश कार्यकारणी सदस्य अँड गणेश ठाकूर, तालुकाध्यक्ष सर्जेराव दिंडे, शहराध्यक्ष बबन सोनूने, गणेश पाटील, सखाराम इंगळे, विलास काळे, अँड. शेषराव कदम, डिगांबर गिरी, नामदेव गिरी,संजय पडोळे यांच्यासह भाजपाचे शक्तीप्रमुख, सुपर वॉरियर्स यांची उपस्थिती होती.

यावेळी भाजपचे संयोजक फुलाजीराव शिंदे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ११ वर्षाच्या यशस्वी कार्यकाळात महत्वाकांक्षी व कल्याणकारी योजनांची माहीती दिली. तसेच मोदींनी जागतिक पातळीवर देशाचा गौरव वाढविला असून शेतकरी, महिला, कामगार तसेच सर्वसामान्यांना विविध योजनांचा लाभ मिळत आहे. यासंदर्भात भाजपच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात जाऊन केंद्र सरकारच्या यशस्वी ११ वर्षाच्या कार्यकाळातील योजना, निर्णय आणि अंमलबजावणीची माहीती लोकांना घरोघरी जाऊन द्यावी असे आवाहन केले.

यावेळी सुरजितसिंग ठाकूर यांनीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ११ वर्षाच्या यशस्वी वाटचालीची माहीती दिली.

# श्री संत गजानन महाराज पालखीचे औंढ्यात स्वागत

**तभा वृत्त सेवा**
**हिंगोली, १४ जून**





शेगाव येथील श्री संत गजानन महाराज पालखी सोहळ्याचे शनीवारी (ता. १४) सकाळी अकराच्या सुमारास औंढा शहरात आगमन झाले. ज्ञानबा-तुकारामचा जयघोष अन् टाळ-मृदंगाच्या गजराने औंढा नागनाथ नगरी दुमदुमून गेली होती.सकाळी अकराच्या सुमारास श्री संत गजानन महाराज पालखी सोहळा शहरात दाखल झाला. पालखी मार्गासह घराघरांसमोर आकर्षक रांगोळ्या काढून दिंडीचे जंगी स्वागत करण्यात आले. पोलिस ठाणे, कासारगल्ली, रहीम चौक, जोशी गल्ली, नगरपंचायत रोड, डॉ. हेडगेवार चौक, स्व. मीनाताई ठाकरे चौकामार्गे आठवे ज्योतिर्लिंग श्री नागनाथ मंदिरामध्ये पालखीचे आगमन झाले.

देवस्थानचे अध्यक्ष तथा तहसीलदार हरीश गाडे यांनी पालखीचे दर्शन घेऊन मनोभावे पूजा केली. यावेळी देवस्थानचे अधीक्षक वैजेनाथ पवार, व्यवस्थापक सुरेंद्र डफळ, नायब तहसीलदार प्रवीण ऋषी, वैजनाथ भालेराव, नगराध्यक्ष एस पी कनकुटे, उपनगराध्यक्ष अनिल देव, नंदकुमार पाटील यांनीही दर्शन घेतले. दिंडीतील वारकऱ्यांसाठी नंदकुमार पाटील यांनी भक्त क्रमांक दोनमध्ये भोजनाची व्यवस्था केली.जेवणानंतर पालखी दुपारी दोनच्या सुमारास जवळा बाजारकडे रवाना झाली.

वारकऱ्यांसाठी गलांडी फाटा, पिंपळदरी फाटा, बंजारा कॉलनी, राम मंदिर, डॉ. हेडगेवार चौक, विशाल हॉटेल यासह ठिकठिकाणी चहा पाण्याची सोय करण्यात आली होती

यावेळी पोलिस निरीक्षक जी. एस. राहीरे,पोलिस उपनिरीक्षक दत्ता कानगुले, पोलिस उपनिरीक्षक पंजाबराव थिट्टे,पोलिस उपनिरीक्षक अफसर पठाण, यशवंत गुरुपवार, रविकांत हरकाळ, संदीप टाक, ज्ञानेश्वर गोरे, गजानन गिरी, राजकुमार कुटे, सुभाष जयताडे, विश्वनाथ ढोणे, सुरेश डाखुरे, तानाजी ठाकरे, रमेश मस्के, माधव सुर्यवंशी, विजय कालवे, किशोर पारीसकर यांच्यासह पोलिस कर्मचाऱ्यांनी बंदोबस्त तैनात केला होता.

शनिवारी सायंकाळी जवळा बाजार येथे पालखीचा मुक्काम होता. जवळा बाजार येथे पालखीच दाखल होताच जैन परिवाराच्यावतीने स्वागत करीत वारकऱ्यांच्या भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. येथील शाळेच्या प्रांगणात गावकऱ्यांच्या वतीने पालखीच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांना लाडूच्या प्रसादाचे वाटप करण्यात आले.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ११ वर्षांची कारकिर्द 'संकल्प से सिद्धी तक' : खा. अशोक चव्हाण

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१४ जून -**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या यशस्वी कारकिर्दीला नुकतीच ११ वर्षे पूर्ण झाली. हा कालखंड देशाच्या सर्वांगीण आणि दूरगामी विकासाला गती देणारा ठरला.

पंतप्रधान मोदींनी 'सब का साथ, सब का विकास, सब का विश्वास, सब का प्रयास' चा मुलमंत्र स्वीकारला. सर्वसामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून कारभार केला असल्याने ११ वर्षांची ही कारकिर्द 'संकल्प से सिद्धी तक' अशीच राहिली असे मत खा. अशोक चव्हाण यांनी व्यक्त केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कारकिर्दीला ११ वर्षे पुर्ण झाल्याच्या निमित्ताने आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

या पत्रकार परीषदेस पालकमंत्री अतुल सावे, आ. श्रीजया चव्हाण, आ. राजेश पवार, आ. डॉ. तुषार राठोड, जिल्हाध्यक्ष डॉ. संतुक हंबर्डे, अॅड. किशोर देशमुख, महानगराध्यक्ष अमर राजुरकर, कार्यकारीणी सदस्य चैतन्यबापु देशमुख आदींची उपस्थिती होती.

पुढे ओलताना खा. अशोक चव्हाण म्हणाले कि, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत विकसित भारत घडविण्याचा संकल्प केला आहे. विकसित भारताच्या प्रवासात देशातील सर्व क्षेत्रे आणि सर्व समाजघटकाचाही विकास व्हावा, यासाठी



त्यांनी अनेक आघाड्यांवर क्रांतिकारी, परिवर्तनकारी निर्णय घेतले.

या ११ वर्षात विकसित भारताची पायाभरणी झाली. अनेक क्षेत्रात देश आत्मनिर्भर होण्याच्या वाटेवर अग्रेसर झाला. हा कालखंड विकासाचा अमृतकाळ ठरला.

या कार्यकाळात त्यांनी सर्वसमावेशक राज्यकारभार आणि लोककेंद्रित विकासाला प्राधान्य दिले... ही कारकिर्द गरीबांच्या कल्याणासाठी, सर्वसामान्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवणारी आणि भारताच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारी ठरली. या निमिताने त्याचे काही दाखले मी आपल्यासमोर ठेवतो आहे. शेती व शेतकरी, आरोग्य, लोककल्याण, नारीशक्ती, उद्योग व रोजगार निर्मिती, पायाभूत सुविधांचा विकास, राष्ट्रीय सुरक्षा व संरक्षण, अध्यात्म व संस्कृती, विज्ञान व तंत्रज्ञान आदी क्षेत्रात प्रगती आणि सुधारणा करण्यात आल्या. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था बनला आहे... भारतीय अर्थव्यवस्थेने ११ व्या क्रमांकावरून चौथ्या क्रमांकावर झेप घेतली. पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदींचा हा कार्यकाळ देशाचा आत्मविश्वास वाढवणारा आणि आपली क्षमता जागतिक पातळीवर सिद्ध करणारा ठरला... 'मोदी हे तो मुमकिन है' हा विश्वास भारतीयांमध्ये निर्माण झाला. त्यामुळेच सलग तीन लोकसभा निवडणुका व अनेक प्रमुख राज्यांच्या विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने मोठे यश मिळवले असुन ही तर फक्त सुरुवात आहे... पुढच्या काळासाठीही मोदीजींचे अनेक संकल्प आहेत आणि त्यांच्या अथक मेहनतीने, दूरदृष्टीने आणि या देशातील नागरिकांच्या समर्थनाने ते संकल्प सुद्धा नक्कीच तडीस जतील याचा संपूर्ण भारताला विश्वास असल्याचे खा. अशोक चव्हाण यावेळी म्हणाले.

## संक्षिप्त वृत्त

### एसबीआय माहूर शाखेच्यावतीने आयोजित रक्तदान शिबिरास प्रतिसाद

**माहुर -**भारतीय स्टेट बँकेच्या ७० व्या स्थापना दिनानिमित्त एसबीआय, शाखा माहूरच्या वतीने शुक्रवार दि.१३ जून सकाळी १० ते दुपारी ०४



या कालावधीत रक्तदान शिबिर संपन्न झाले. यावेळी शाखेचे ग्राहक आणि शहरवासीयांसह तालुक्यातील नागरिक असे मिळून एकूण ४० रक्तदात्यांनी या शिबिरात आपले रक्तदान केले असल्याची माहिती, शाखा व्यवस्थापक कमलेश कुमार यांनी दिली आहे. १ जुलै रोजी स्टेट बँक ऑफ इंडिया ७० वर्षांची होणार आहे. हा दिवस डइख शाखांमध्ये डइख उत्सव दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्ताने भारतीय स्टेट बँक देशभरात विविध उपक्रम राबवित असते. त्याअंतर्गत यावर्षी एसबीआय माहूर शाखेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरास रक्तदात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, शिबिरात एकूण ४० रक्तदात्यांनी आपले रक्तदान केले. गुजरात मधील अहमदाबाद येथे १२ जून रोजी झालेल्या विमानाच्या एअर क्रॅशच्या भिषण अपघाताच्या दुर्घटनेनंतर मोठ्या संख्येतील जखमींना जेव्हा रक्ताची आवश्यकता होती त्यावेळी शासनाच्या वैद्यकीय विभागामार्फत करण्यात आलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत अनेक नागरिकांनी आपले अमूल्य रक्तदान केले. त्यामुळेच रक्तपुरवठा करणाऱ्या रक्तपेढींनी काही वेळातच मुबलक रक्तसाठा ब्लड बँकेत जमा केल्याने डॉक्टरांनी अनेक गंभीर जखमींचे प्राण वाचवले. आणि म्हणूनच रक्तदान हे श्रेष्ठदान असून आपल्या बहुमूल्य रक्तदानातून रक्तदाता रक्ताची गरज असलेल्याला जीवनदान देतो. याच उदात्त हेतूने एसबीआय माहूर शाखेच्या वतीने शुक्रवारी रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले आणि अहमदाबाद येथील विमान दुर्घटनेने रक्तदान हे किती महत्त्वाचे आहे याची जाणीव होऊन शहरासह तालुक्यातील ४० रक्तदात्यांनी या शिबिरात उत्स्फूर्तपणे सहभागी होत आपले रक्तदान या शिबिरात केले. यावेळीएसबीआय माहूर शाखेच्यावतीने सर्व रक्तदात्यांना वेगवेगळ्या दोन प्रकारच्या भेटवस्तू आणि प्रशस्ती पत्र देऊन त्यांचा सत्कार करत शाखा व्यवस्थापक कमलेश कुमार यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. तसेच शिबीर यशस्वी करण्यासाठी रक्तसंकलन करणाऱ्या रक्तपेढीचे सर्व डॉक्टरांची चमू, शाखेचे सर्व अधिकारी, कर्मचारी, त्याचप्रमाणे या शिबिराला आपल्या वृत्तपत्रातून प्रसिद्धी देऊन शिबीर यशस्वी करण्यासाठी सहकार्य केल्याबद्दल विविध माध्यमांचे सर्व प्रतिनिधी यांचे सुद्धा शाखा व्यवस्थापक कुमार यांनी विशेष आभार मानले.

### विकासा संदर्भात तळेगावकरानी घेतली आमदार राजेश पवार यांची भेट



**उमरी -** तालुक्यातील मौजे तळेगाव येथिल नागरीकांनी आमदार राजेश पवार यांच्या फुलेनगर येथिल निवास्थानी यांनी भेट घेवून तळेगाव ग्राम पंचायत हद्दीतील विविध विकासा संदर्भात चर्चा केली आहे. राज्याचे सुधारित युवा धोरण ठरविण्यासाठी शासनाने गठीत केलेल्या समितीवर सदस्य म्हणून आ. राजेश पवार यांची निवड झाल्याबद्दल पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.उमरी तालुक्यातील तळेगाव येथिल पाणी प्रश्न, ओड समाज, भोई समाज आणि मन्नेरवारलू समाजाचे समाज मंदीरा साठी निधीची मागणी करून कागदपत्र सादर केली. अत्यंत हसी खेळीचे वातावरणात आमदार यांच्यासोबत गावचे विकास कामांविषयी चर्चा झाली. ह्यावेळी उमरीचे माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी, सरपंच प्रतिनिधी सुरेशराव देशमुख, उपसरपंच प्रतिनिधी मोगल लुखमानबेग व ग्राम पंचायत अधिकारी बैलकवाड यांची उपस्थिती होती.

### मराठवाडा लोकविकास समन्वय संघर्ष समितीची नूतन कार्यकारिणी जाहीर

**नांदेड-** जनसामान्यांचे प्रश्न घेऊन अन्यायाच्या विरोधात लढणारी, जात-पात, धर्म व राजकारण विरहित मराठवाडाभर लोकशाही पद्धतीने कार्यरत असणारी मराठवाडा लोकविकास समन्वय संघर्ष समितीची दि. ०८-०६-२०२५ रोजी डॉ. राजेश माने यांच्या शिव पॅथॉलॉजीकल लॅबच्या सभागृहात मासिक बैठक पार पडली. त्यात सर्वांनूमते नूतन कार्यकारिणी आखण्यात आली असून कार्यकारिणी खलील प्रमाणे आहे. या समितीतील सदस्यांचा कार्यकाळ ३ वर्षांचा असुन समिती सदस्यांनी स्वार्थ व प्रलोभनांपासून दूर राहून जनकल्याण साधावे असे सर्वांना अपेक्षित आहे. प्राध्यापक रमाकांत जोशी चिखलीकर हे नूतन अध्यक्ष असून जगन पांचाळ व केशव वाघमारे हे उपाध्यक्ष म्हणून कार्य करतील. बंडोपंत कुंटुरकर सचिव तर डॉ. राजेश माने व संजय शर्मा हे सहसचिव म्हणून कार्य करतील. दीपक आडगावकर यांची कोषाध्यक्षपदी निवड झाली असून त्यांना शिवाजी कंठाळे सहकोषाध्यक्ष म्हणून साहाय्य करतील तर मीडिया प्रसिद्धीचे प्रमुख म्हणून कृष्णा उमरीकर, तर सखाराम कुलकर्णी हे सह प्रसिद्धी प्रमुख म्हणून काम बघतील. आर बी दुडके व गंगाधर शिंदे हे बैठक निमंत्रक व आयोजक म्हणून तर अॅड. धोंडिबा पवार व ऍड. संजय जांबकर हे कायदेशीर सल्लागार म्हणून भार सांभाळतील. आशाताई पैठणे या महिला संघटक तसेच साहित्य विभाग प्रमुख म्हणून कार्य करतील. मार्गदर्शक सदस्य म्हणून दिवाकर मुगुटकर, रामणारायन बंग, अरविंद भारतीया, पुरुषोत्तम नाईक, डॉ. मुकुंद पांडे, रमेश यन्नावार, उद्योजक विजय गवारे, सुदेश मुक्कावर, सदाशिव हणमंते, प्राध्यापक गोविंद चौधरी, शंकर कुबडे यांची सर्वानुमते निवड झालेली आहे.

## नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने भरपाई देण्यासाठी प्रयत्न करणार : पालकमंत्री सावे



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड , दि.१४ जून -**

मागील काही दिवसांपासून नांदेड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पाऊस, वादळी वारा सुरु आहे. यामुळे जिल्ह्यात विविध ठिकाणी नुकसान झाले आहे. अर्धापूर शिवारात केळी, पपई फळबाग असलेल्या शेतकऱ्यांच्या पिकांचेही मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या शेती पिकांचा अहवाल शासनास त्वरीत सादर केला जाईल. जिल्ह्यातील नुकसानग्रस्त बाधित शेतकऱ्यांना तातडीने भरपाई मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील अशी ग्वाही राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास व अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे दिली.

आज अर्धापूर तालुक्यातील चिंचबन, अर्धापूर शिवार, लहान शिवारात नुकसान झालेल्या केळी व पिकांची पाहणी त्यांनी केली यावेळी ते बोलत होते. या पाहणी दौऱ्यात त्यांच्यासोबत खासदार अशोक चव्हाण, आमदार श्रीजया चव्हाण, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत आदींची उपस्थिती होती.

यापूर्वी पालकमंत्री अतुल सावे यांनी नुकसानग्रस्त झालेल्या पिकाचे पंचनामे तात्काळ करुन अहवाल शासनास सादर करण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनास दिले होते. त्यानुसार येत्या मंत्रीमंडळ बैठकीत नुकसानीचा अहवाल सादर करुन नुकसाग्रस्त शेतकऱ्यांना लवकर भरपाई मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. अर्धापूर तालुक्यातील चिंचबन येथील शेतकरी ज्ञानेश्वर शेट्टे, अर्धापूर शिवारातील व्यंकटराव साखरे, लहान शिवारातील गिरीश कल्याणकर व विठ्ठल इंगळे यांच्या शेतात जाऊन केळी व पपई या पिकांच्या नुकसानीची पाहणी त्यांनी केली. यावेळी त्यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद साधून शेतकऱ्यांना योग्य ती मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

**पालकमंत्री अतुल सावे यांनी घेतला आढावा**

पालकमंत्री अतुल सावे यांनी आज नांदेड शासकीय विश्रामगृह येथे जिल्ह्यात अतिवृष्टी व वादळामुळे नुकसान झालेल्या केळी व पपई या फळ पिकांचा तसेच सर्व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने त्वरीत अहवाल तयार करुन शासनाला सादर करावा, असे निर्देश त्यांनी दिले. यावेळी त्यांनी जिल्ह्यातील सर्व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी विविध विषयांवर चर्चा करुन उपयुक्त सूचना दिल्या.

जिल्ह्यातील केळी या पिकाच्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना योग्य ती विशेष बाब म्हणून मदत मिळवून देण्याची मागणी पालकमंत्री अतुल सावे यांच्याकडे खासदार अशोक चव्हाण यांनी यावेळी केली. यासह जिल्ह्यातील विविध प्रश्नांवर त्यांनी चर्चा केली.

या बैठकीस खासदार अशोक चव्हाण, आमदार डॉ. तुषार राठोड, आमदार श्रीजया चव्हाण, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत तसेच विविध विभागाचे अधिकारी आदींची उपस्थिती होती.

## नायगांव तालुक्यात मान्सूनपूर्व आणि अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांची लगबग



**तभा वृत्तसेवा**
**नायगाव, दि.१४ जून -**

नायगाव तालुक्यात मागील मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. त्यानंतर जूनच्या पहिल्या आठवड्यात तच मान्सूनने दमदार आगमन केल्यामुळे तालुक्या तील हवामानात मोठा बदल झाला असून, अनेक गावांमध्ये जमिनीमध्ये भरपूर ओलावा निर्माण झाला आहे.

नरसी, होटाळा, धानोरा, बेंद्रीखडगाव, मरवाळी, मरवाळी तांडा, मुगाव आदी परिसरांतील शेतजमिनी पेरणीयोग्य झाल्यामुळे शेतकऱ्यांनी यंदाच्या खरीप हंगामासाठी जोमाने तयारी सुरू केली आहे. विशेषतः सोयाबीन या नगदी पिकाच्या पेरणीला तालुक्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या उत्साहात सुरुवात केली आहे.

मे महिन्याच्या अखेरीस झालेल्या अवकाळी पावसा ने जमिनीतील नमी वाढवली. त्याचबरोबर यंदा मान्सूनही वेळेवर दाखल झाल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी वेळेआधीच मशागत पूर्ण करून पेरणीसाठी सज्जता दाखवली आहे. कमी कालावधीत उत्पादन देणारे आणि बाजारात चांगला दर मिळवून देणारे नगदी पीक म्हणून सोयाबीनला यंदा विशेष मागणी आहे. कृषी विभागाच्या माहितीनुसार, यंदा तालुक्यात मोठ्या प्रमाणावर सोयाबीनची लागवड होणार आहे. काही भागांतील शेतकरी यंत्रांच्या सहाय्याने यांत्रिक पद्धतीने पेरणी करत आहेत, तर पारंपरिक पद्धतीने ही काही ठिकाणी पेरणी सुरू झाली आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीलाच पेरणी झाल्यामुळे उत्पादनात वाढ होण्याची शक्यता कृषी तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

होटाळा येथील प्रगतिशील शेतकरी संभाजी जाधव आणि नरसी येथील मनोहर सूर्यवंशी यांनी सांगित लेकी, मे अखेरीपासूनच पाऊस सुरू झाल्यामुळे मशागत लवकर झाली. त्यामुळे योग्य वेळ साधून पेरणी करता आली. हवामान अनुकूल राहिल्यास यंदा उत्पादन चांगले होईल, अशी अपेक्षा आहे. तालुक्यातील शेतकरी, कृषी विभाग आणि बाजार समिती यांना यंदाच्या सोयाबीन हंगामा बाबत मोठ्या आशा असून, हवामानाची साथ राहिल्यास यंदाचा हंगाम शेतकऱ्यांसाठी अत्यंत फायदेशीर ठरू शकतो.

## स्वारातीम विद्यापीठ आणि सीए संघटना यांच्यात धोरणात्मक सहकार्यासाठी संवाद

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड , दि.१४ जून -**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया (ICI), नांदेड शाखा यांच्या दरम्यान शैक्षणिक व औद्योगिक सहकार्यासाठी महत्त्वपूर्ण धोरणात्मक संवाद पार पडला.

या संवादाचा उद्देश विद्यापीठातील एईडीपी (उद्योजकता विकास कार्यक्रम), अभ्यासक्रम डिझाईन, विद्यार्थ्यांना प्रशिक्षण (OJT) तसेच चार्टर्ड अकाउंटंट सदस्यांचा शैक्षणिक उपक्रमात सहभाग वाढवण्याचा होता. दोन्ही संस्थांमध्ये सामंजस्य कराराच्या माध्यमातून या सहकार्यास औपचारिक रूप देण्याचा निर्णय घेण्यात आला.

या बैठकीस विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील आणि नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर उपस्थित होते.

सीए संघटनेच्या वतीने अध्यक्ष सीए जयप्रकाश बराडिया, सीए विजय कलानी, सीए आनंद गर्ग, सीए अवी वट्टमवार, वरिष्ठ सदस्य सीए हर्षद शाह आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी सीए संघटनेच्या प्रतिनिधींनी विद्यापीठाच्या दूरदृष्टी असलेल्या शैक्षणिक उपक्रमांचे कौतुक केले. उद्योगातील कौशल्यांचा शैक्षणिक प्रणालीशी समन्वय साधण्यासाठी व शाश्वत सहकार्य करण्याची तयारी दर्शविली. सीए सदस्यांनी सादर केलेल्या प्रस्तावास कुलगुरूंनी सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी उद्योग-शैक्षणिक समन्वय अत्यावश्यक असल्याचे सांगून, चार्टर्ड अकाउंटंट्सना अतिथी प्राध्यापक म्हणून सहभागी करून घेण्याच्या प्रस्तावाचे स्वागत केले.

या अनुषंगाने कुलगुरू डॉ. चासकर यांनी नांदेड शाखेच्या समिती सदस्यांना विद्यापीठास पुन्हा भेट देण्याचे आमंत्रण दिले. या बैठकीदरम्यान सीए संघटना व विद्यापीठ दोघांनीही भविष्यातील संयुक्त उपक्रमांसाठी बांधिलकी व्यक्त केली. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल विद्यापीठाने वरिष्ठ सीए हर्षद शाह यांचे विशेष आभार मानले.

## तामसा येथे भाजपाची जिल्हास्तरीय कार्यशाळा

**तभा वृतसेवा**
**तामसा , दि.१४ जून -**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सामान्यांच्या विकासातून विकसित भारताचा संकल्प कृतीतून सिद्ध करण्याचा प्रयत्न करीत आहेत. मोदी सरकार बघ्याची नाहीतर दम दाखवायची भूमिका घेण्यात जगात यशस्वी ठरत असल्याचे गौरवोद्गार माजी मुख्यमंत्री खासदार अशोक चव्हाण यांनी शनिवारी (ता.१४) तामसा येथे केले.

भाजपाच्या उत्तर जिल्हा पदाधिकाऱ्यांची संकल्प से सिद्धी तक कार्यशाळा येथे झाली. यावेळी खासदार चव्हाण,आमदार श्रीजया चव्हाण, भाजपचे मराठवाडा संघटनमंत्री संजय कौडगे,जिल्हाध्यक्ष अँड.किशोर देशमुख, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष संध्या राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते भारतमाता पूजन व दीप प्रज्वलन झाले. संघटनमंत्री संजय कौडगे,जिल्हाध्यक्ष ड. देशमुख यांनी संकल्प से सिद्धी तक अभियानाची माहिती सांगितली. आमदार श्रीजया चव्हाण यांनी अभियानादरम्यान कार्यकर्त्यांनी केंद्र व राज्य शासनाचे काम घराघरात पोहोचण्याची जबाबदारी पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची आहे. नांदेड जिल्हा आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत भाजपाचा बालेकिल्ला ठरणार हे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांचे नेतृत्व व कार्यकर्त्यांच्या विश्वासावर सिद्ध होणार असल्याची आशा व्यक्त केली.



पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना माजी मुख्यमंत्री चव्हाण म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे काम अकरा वर्षातून देशासह जग बघत आहे. संकल्पाला कृतीची जोड देण्याची किमया सबका,साथ सबका विकास, सबका विश्वास,सबका प्रयास या मूलमंत्रद्वारे मोदी सरकारने साधली आहे. विरोधक कन्फ्युज्ड पॉलिटिक्सच्या भरोशावर उभा आहे हे दुर्दैवी आहे. फेक नेरीटिव्हच्या भरोशावर विरोधकांची केविलवाणी धडपड चालू आहे.नांदेडहून तामशाला केवळ ४० मिनिटात पोहोचणारा रस्ता हेच मोदी सरकारचे काम आहे. काम करणारा व रिझल्ट देणाराच खरा कार्यकर्ता असून नव्या जुन्या कार्यकर्त्यांनी समन्वयातून पक्षाला आगामी कार्यकर्त्यांच्या विविध निवडणुकीत यशस्वी करण्याचे आवाहन केले. लवकरच हदगाव तालुक्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सभा होणार असल्याचे माजी मुख्यमंत्री चव्हाण यांनी सांगितले.सूत्रसंचालन प्रा. किशन मिराशे यांनी केले. आभार भागवत देवसरकर यांनी मानले. यावेळी आनंदराव भंडारे, गणपत पीठेवाड, संतोष मारकवाड, उमाकांत भोरे, बापूराव घारके, सुप्रिया मुनेश्वर,सचिन तांदळे, निखिल काला, शंकर जगदाळे,शिवराज वारकड, महेश मठपती, लक्ष्मीकांत कोठुळे,स्वप्निल रामगिरवार, दिनेश तवर,राहुल शिंदे, देवानंद वानखेडे, अविनाश कदम आदींसह हदगाव, हिमायतनगर,किनवट,माहूर, भोकर तालुक्याचे भाजप पदाधिकारी उपस्थित होते.

## शहराच्या विकासासाठी निधीची कमतरता भासु देणार नाही: आ. चिखलीकर

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि.१४ जून -**

शहराच्या विकासासाठी निधीची कमतरता भासु देणार नाही असे आ.प्रताप पाटील चिखलीकर यांनी नगर परिषद सभागृहाच्या आढावा बैठकीत म्हणाले आगामी शहराच्या विकासाचा आंजिठा तयार केला आहे.आगामी २५ वर्षा पर्यंत वाढती लोकसंख्या गृहीत धरून विकासाचे आराखडे नगर परिषदेने तयार करावेत विकासासाठी निधी कमी पडणार नाही या शहराची वेगळी ओळख निर्माण व्हावी यासाठी लागेल तेवढा निधी दिला जाईल असेही म्हणाले यावेळी माजी नगराध्यक्ष कल्याणराव सूर्यवंशी, माणिकराव




मुकदम, राष्ट्रवादी कोंग्रेसचे सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर,कंधार तहसीलदार रामेश्वर गोरे, तहसीलदार विठ्ठल परळीकर,मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे, बांधकाम विभागाचे उपअभियंता मोहनराव पवार, जि प बांधकाम उपअभियंता शिवाजी राठोड, महावितरण उपअभियंता श्री सुतार, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, छत्रपती धुतमल ,दताभाऊ वाले, गटनेते करीम शेख, शहर अभियंता शरद राहेरकर, , उल्हास राठोड यांची उपस्थिती होती

शहरात बाजार पेठ निर्माण व्हावी म्हणुन जूनी न्यायालयाची इमारत व सध्या पोलिस स्टेशनच्या जागेवर बिओटी तत्वावर व्यापारी संकुलन तयार करण्यात येईल शहरातील अहिल्याबाई देवी होळकर ते शासकीय विश्राम डॉ.बाबासाहेब चौका पर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूला नगर परिषद व वनविभाग, सामाजिक विभागाने वृक्ष लागवड करावी जेणेकरुन शहराची शोभा वाढेल. अनेक वर्षापासुन नविन बांधकाम केलीली पोलिस ठाण्याची ईमारत हास्तांतर करण्यासाठी उर्वरित कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. शहराच्या मुख्या रस्त्यापासुन ते बस स्थानकाच्या पाटी मागुन व बांधकाम विभागाच्या बाजुने नविन रस्त्यासाठी लोव्हेकराशी बोलने झाले आहे तोही प्रशन लवकरच मार्गी लावला जाईल. नगर परिषदेने शहराची स्वच्छता आठ दिवसांत निकाली काढावी या नंतर कोणाची तक्रार येणार नाही अशी स्वच्छता विभागाने दखल घ्यावी ,सुनेगाव तलाव परिसरात लघु पाट बंधारे विभागाची जागा आहे त्या परिसरात गार्डन तयार करण्याचा अनेक दिवसांपासूनचा संकल्पना आहे तो प्रश्न मार्गी लावला जाईल.शहरातील ड्रेनेजचा प्रशन लवकर मार्गी लावण्यासाठी शहरात या कामाचा सर्वे चालू केला आहे.शहरासाठी कायम पाणी पुरवठा करणारे गुत्तेदार संथ गतीने काम चालू आहे नगर परिषदेने ठोस निर्णय घेणे गरजेचे आहे.शहरातील मुख्य रस्त्यावर दिवा बत्ती बंद आहे या कडे नगरपरिषदेने लक्ष द्यावे घरकुल विभागाने निधी प्राप्त झाला म्हणुन गवगवा केला पण निधी कुठे गेला घरकुलाच्या लाभधारकानी निधीची मागणी करा म्हणुन आह्वान केले पण लाभधारकाच्या घशात निधी पडलाच नाही हा प्रशन लवकरच मार्गी लावला जाईल.शहराच्या विकासा साठी ६६३ कोटीचा आराखडा तयार केला आहे. आगामी २५ वर्षे पर्यंतचा अजिंठा तयार केल्याची बैठकीत माहिती दिली या बैठकीला भास्कर पाटील पवार,जिवन पाटील चव्हाण,बालाजी खिल्लारे, पंचशील कांबळे,सतिश निखाते,यासह अनेक पदाधिकारी व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

तरुण भारत
वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!



श्री सुरेशराव मालक
चेअरमन कोनाथा

तरुण भारत
वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!



:: शुभेच्छुक ::
देविसिंग ठाकूर, हिंगोली.









सोलापूर तरुण भारत
वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!

-: शुभेच्छुक :-



मा.दिलीपदादा चव्हाण
जिल्हाध्यक्ष : राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) हिंगोली
माजी नगराध्यक्ष : नगर परिषद, हिंगोली.



सोलापूर तरुण भारत
वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!

-: शुभेच्छुक :-



आ.तान्हाजीराव मुटकुळे
आमदार, हिंगोली विधानसभा



फुलाजीराव शिंदे
माजी जिल्हाध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, हिंगोली.

सोलापूर तरुण भारत
वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!

अशोक शिक्षण संस्था, शिंदेफळ द्वारा संचलित
रुक्मिणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,
पळशी ता.सेनगाव, जि.हिंगोली.

* सतत पाच वर्ष १०० टक्के निकालाची परंपरा कायम
* भव्य क्रिडांगण उपलब्ध * विद्यार्थ्यांसाठी कॉम्पुटर लॅब
* भव्य ग्रंथालय उपलब्ध * विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर

एस.एन.वाठोरे
अध्यक्ष

सोलापूर तरुण भारत
वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!



ॲड.गयबाराव नाईक
माजी जि.प.सदस्य, हिंगोली. माजी संचालक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, परभणी



नाईक पेट्रोलियम
नाईक नगर, हिंगोली.

## उगम ग्रामीण विकास संस्था
उमरा ता. कळमनुरी जि. हिंगोली
### अंतर्गत राबविण्यात येणारे उपक्रम

**देसाई फॉंडेशन ट्रस्ट अंतर्गत राबविण्यात येणारे उपक्रम**

- नेत्र तपासणी व जाणीव जागृती
- बालरोग तपासणी व जाणीव जागृती
- स्त्री रोग तपासणी व जाणीव जागृती
- सामान्य आरोग्य तपासणी व जाणीव जागृती
- मेणबत्ती आणि दिवा बनविणे
- केक बनविणे
- ज्वेलरी घडविणे
- उद्योजक्ता प्रशिक्षण
- व्यक्तिमत्व विकास
- करियर मार्गदर्शन

**कयाधू नदी काठावरील गवताळ पट्ट्याचे संवर्धन कार्यक्रम (महाराष्ट्र जनुक कोश कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणारे उपक्रम)**

- शेतकरी यादी तयार करणे
- गवताचे हर्बेरीयम तयार करणे
- पर्यावरण शिक्षण शाळेत सुरू करणे.
- पीक आणि गवत यांचा तुलनात्मक अभ्यास
- विविध संशोधन

**अजीम प्रेमजी फॉंडेशन मार्फत राबविण्यात येणारे उपक्रम**

- शुद्ध पिण्याचे पाणी
- पाणी साठवण व्यवस्था
- वन्य प्राण्यांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था
- पाळीव प्राण्यांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था
- पाणलोट क्षेत्र विकास
- पाणी पुरवठा व्यवस्था

**पारंपरिक वाणांचे संवर्धन (टेबटेब्बा फॉंडेशन मार्फत राबविण्यात येणारे उपक्रम)**

- मूग, उडीद, ज्वारी, भादली, कराळ पिकाची बीज बँक तयार करणे
- सेंद्रिय प्लॉट निर्मिती करणे
- पाणलोट क्षेत्र विकास
- वृक्ष लागवड
- शेती शाळा
- पारंपरिक अन्न महोत्सव
- माती परीक्षण
- सेंद्रिय खते-औषधी प्रात्यक्षिक
- गाव विकास समिती गठन
- जैवविविधता समिती गठन
- हिरवे आणि स्वच्छ अन्नाचे महत्व
- शेतकरी उत्पादन कंपनी

**तरुण भारत सोलापूर आवृत्तीच्या वर्धापन दिनानिमित हार्दिक शुभेच्छा!**

सोलापूर तरुण भारत
वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!



श्री राजरत्न कुंटे सर
सरपंच, कोनाथा ता. वसमत

सोलापूर तरुण भारत
वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!

तलाठी संघटना, हिंगोली तालुका

शेख मोहिब अहमद
अध्यक्ष

अमोल घोंगडे
सचिव




